सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# कार्यक्रम अंदाजपत्रक

## (एक)

## २०२६-२०२७

### नियोजन विभाग (मंत्रालय)

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर
२०२६

# कार्यक्रम अंदाजपत्रक

# (एक)

# २०२६-२०२७

# नियोजन विभाग (मंत्रालय)

**नियोजन विभागाने तयार केलेल्या कार्यक्रम अंदाजपत्रकांची यादी**

| अ. क्र. | कार्यक्रम अंदाजपत्रकाचा क्रमांक | कार्यक्रम अंदाजपत्रकाचे नाव |
|---|---|---|
| १) | (एक) | नियोजन विभाग (रोहयो प्रभागासह) |
| २) | (दोन) | अर्थ व सांख्यिकी संचालनालय |

# अनुक्रमणिका


| | | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| प्रस्तावना | ... ... ... ... ... ... | (पाच) |
| कार्यक्रम प्रभाग | ... ... ... ... ... ... | १ |
| कार्यक्रम-- | | |
| **(अ)** | **विभागाचे विशिष्ट कार्यक्रम --** | |
| १. | राज्याचा वार्षिक कार्यक्रम ... ... ... ... | १ |
| २. | जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) ... ... ... ... | २ |
| ३. | अर्थ व सांख्यिकी संचालनालय ... ... ... ... | ३ |
| ४. | महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र ... ... ... ... | ३ |
| ५. | महाराष्ट्र जिओटेक्नॉलॉजी ॲप्लिकेशन सेंटर (महाजिओटेक) ... ... ... | ४ |
| ६. | विकास मंडळे ... ... ... ... ... | ४ |
| ७. | डोंगरी विभाग विकास कार्यक्रम ... ... ... ... | ५ |
| ८. | छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे ... ... | ६ |
| ९. | अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ ... ... ... | ७ |
| १०. | शाश्वत विकास ध्येये ... ... ... ... ... | ८ |
| ११. | विकसीत महाराष्ट्र - २०४७ ... ... ... ... | ८ |
| **(ब)** | **विभागाचे अतिरिक्त कार्यक्रम --** | |
| १. | तीर्थक्षेत्र व पर्यटन स्थळ विकास आराखडा ... ... ... | १० |
| २. | मानव विकास कार्यक्रम ... ... ... | १३ |
| ३. | खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम ... ... ... ... | १३ |
| ४. | आमदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम ... ... ... ... | १४ |
| ५. | नक्षलग्रस्त भागाच्या जलद विकासासाठी विशेष कृतीदल ... ... ... | १४ |
| ६. | राज्यस्तरिय बँकर्स समिती ... ... ... ... | १४ |
| ७. | प्रादेशिक ग्रामीण बँकांना भाग भांडवल देणे ... ... ... | १४ |
| ८. | केंद्र व राज्य शासनाच्या बँकिंगशी निगडित योजनांची प्रचार, प्रसिद्धी व समन्वय ... | १५ |
| ९. | अ) आकांक्षित जिल्हा कार्यक्रम ... ... ... ... | १५ |
| | ब) आकांक्षित तालुका कार्यक्रम ... ... ... ... | १५ |
| | क) आकांक्षित शहरे कार्यक्रम .. .. .. .. | १६ |
| १०. | रोजगार हमी योजना ... ... ... ... | १७ |
| ११. | महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ... ... ... | १७ |
| १२. | महाराष्ट्र इन्स्टिट्युशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्र) ... ... ... | २१ |
| १३. | मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रम ... ... ... ... | २२ |
| १४. | परशुराम आर्थिक विकास महामंडळ ... ... ... ... | २२ |
| १५. | वीर शिरोमणी महाराणा प्रताप आर्थिक विकास महामंडळ ... ... ... | २२ |
| १६. | श्री वासवी कन्यका आर्थिक विकास महामंडळ ... ... ... | २३ |
| (क) | अधिकारी/कर्मचारी गोषवारा ... ... ... | २४ ते ३१ |
| (ड) | अर्थसंकल्पीय अंदाज २०२६-२७ मधील सुस्पष्ट अर्थसहाय्य ... ... | ३२ |
| (इ) | विवरणपत्रे ... ... ... ... | ३३ ते ३९ |

# प्रस्तावना

वार्षिक कार्यक्रमामध्ये समाविष्ट केलेल्या वेगवेगळ्या योजनांच्या अंमलबजावणीवर अधिक चांगले आणि प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी दिनांक १ सप्टेंबर, १९७२ पासून नियोजन विभाग हा स्वतंत्र विभाग निर्माण करण्यात आला.

या विभागाचे प्रमुख कार्य राज्य आणि जिल्हा पातळीवर वार्षिक कार्यक्रम आखणी करणे हे आहे. त्याशिवाय हा विभाग संस्थात्मक अर्थसहाय्य देणाऱ्या अभिकरणांमध्ये संपर्क साधून विकास योजनांसाठी अधिक साधनसामग्री उपलब्ध करून देण्यासाठी मदत करतो.

नियोजन विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील विशिष्ट व अतिरिक्त कार्यक्रम खालीलप्रमाणे आहेत :-

**अ) विभागाचे विशिष्ट कार्यक्रम-**

१) राज्याचा वार्षिक कार्यक्रम
   i) कार्यक्रमांतर्गत योजनांचे समवर्ती मूल्यमापन
   ii) केंद्रसहाय्यित योजना
   iii) राज्य नियोजन मंडळ
   iv) २० कलमी कार्यक्रम २००६ चे नियंत्रण
२) जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण)
३) अर्थ व सांख्यिकी संचालनालय
४) महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र
५) महाराष्ट्र जिओटेक्नॉलॉजी ॲप्लिकेशन सेंटर (महाजिओटेक)
६) विकास मंडळे
७) डोंगरी विभागाच्या विकासासाठी विशेष कृती कार्यक्रम
८) छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे
९) अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ
१०) शाश्वत विकास ध्येय
११) विकसित महाराष्ट्र - २०४७

**(ब) विभागाचे अतिरिक्त कार्यक्रम**

१) तीर्थक्षेत्र व पर्यटन स्थळ विकास आराखडा
२) मानव विकास कार्यक्रम
३) खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम
४) आमदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम
५) नक्षलग्रस्त भागाच्या जलद विकासासाठी विशेष कृती दल.
६) राज्यस्तरीय बँकर्स समिती
७) प्रादेशिक ग्रामीण बँकाना भाग भांडवल
८) केंद्र व राज्य शासनाच्या बँकिंगशी निगडित योजनांचा प्रचार, प्रसार व समन्वय
९) आकांक्षित जिल्हा कार्यक्रम
१०) रोजगार हमी योजना
११) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना
१२) महाराष्ट्र इन्स्टिट्युशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्र)
१३) मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रम
१४) परशुराम आर्थिक विकास महामंडळ
१५) वीर शिरोमणी महाराणा प्रताप आर्थिक विकास महामंडळ
१६) श्री वासवी कन्यका आर्थिक विकास महामंडळ

अर्थ व सांख्यिकी संचालनालय हे नियोजन विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली असून त्याचे कार्यक्रम अंदाजपत्रक स्वतंत्रपणे प्रसिद्ध करण्यात येते.

नियोजन विभागाकडून कार्यान्वित केल्या जाणाऱ्या कार्यक्रमावरील एकूण अर्थसंकल्पीय अंदाजाचा मुख्य लेखाशीर्ष व कार्यक्रमानुसार तपशील विवरणपत्र "अ" व "ब" मध्ये देण्यात आलेला आहे.

# कार्यक्रम प्रभाग

## १. सचिवालय आर्थिक सेवा

नियोजन विभागाचे कार्यक्रम प्रभाग व रोजगार हमी योजना प्रभाग असे दोन प्रमुख प्रभाग आहेत. कार्यक्रम प्रभागात प्रामुख्याने कार्यक्रमांतर्गत बाबींचा समन्वय साधला जातो. त्याकरिता कार्यक्रमांतर्गत अपेक्षित व्यय निश्चित करून त्यानुसार निधीचे वाटप केले जाते.

सचिव व विकास आयुक्त या विभागाच्या प्रमुख असून कार्यक्रम प्रभागाशिवाय विभागाच्या आस्थापनाविषयक बाबी त्यांच्या नियंत्रणाखाली आहेत.

या दोन्ही प्रभागांच्या मंत्रालयीन स्तरावरील आस्थापनाविषयक बाबी आस्थापना शाखा हाताळते. विभागाच्या नियंत्रणाखालील अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या आस्थापनाविषयक बाबीदेखील मंत्रालयीन प्रशासकीय विभाग म्हणून या विभागाकडून हाताळल्या जातात.

नियोजन विभागाच्या कार्यकक्षेत राज्य नियोजन मंडळ असून सदर मंडळावर कार्यकारी अध्यक्षाची नियुक्ती करण्यात येते व त्यांना मंत्रिपदाचा दर्जा दिला जातो. या राज्य नियोजन मंडळाच्या आस्थापनाविषयक बाबी नियोजन विभागाकडून हाताळल्या जातात.

विभागाची एकत्रित कामे पार पाडण्यासाठी सचिव (नियोजन) व सचिव (रो.ह.यो.) यांना ११ सह/उप सचिव, १३ अवर सचिव, १ विशेष कार्य अधिकारी (पत व पद्धती) व अन्य ४६ अधिकाऱ्यांचे सहाय्य लाभले आहे. नियोजन विभागामधील विकास क्षेत्राची कामे, रोजगार हमी योजना आणि आस्थापनाविषयक बाबींसंबंधीची कामे पाहण्यासाठी एकूण ४४ कार्यासने कार्यरत आहेत.

## (अ) विभागाचे विशिष्ट कार्यक्रम

### १. राज्याचा वार्षिक कार्यक्रम

**१.१.** राज्याच्या वार्षिक कार्यक्रमाची आखणी करणे हे कार्यक्रम प्रभागाचे मुख्य कार्य आहे. सन २०१७-१८ या आर्थिक वर्षापासून "योजनांतर्गत खर्च" व "योजनेतर खर्च" ही संकल्पना वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१६/प्र.क्र.८८/अर्थ-१, दि. २७/०१/२०१७ नुसार रद्दबातल झाली आहे. त्याऐवजी सर्व प्रकारच्या खर्चाची "अनिवार्य खर्च" व "कार्यक्रमावरील खर्च" अशी विभागणी करण्यात आलेली आहे.

शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. संकीर्ण-२०१६/प्र.क्र.८८/अर्थ-१, दि. १२/११/२०१८ नुसार "कार्यक्रमावरील खर्च" याचे समन्वयन करण्याची जबाबदारी नियोजन विभागाकडेच सोपविण्यात आली असल्याने प्रचलित असलेल्या पद्धतीनुसार वार्षिक योजनेची आखणी करण्यात येत आहे.

**१.२** प्रशासकीय विभागांना त्यांच्या विभागाशी संबंधित अशा विकास क्षेत्र/उपक्षेत्राखाली येणाऱ्या योजनांची प्रारूपे तयार करण्यास सांगितले जाते. प्रशासकीय विभागांकडून प्राप्त झालेल्या योजनांच्या प्रारुपाबाबत नियोजन विभागाचे मंत्री हे संबंधित प्रशासकीय विभागांचे प्रभारी मंत्री महोदय व प्रशासकीय विभागाचे सचिव यांच्यासमवेत चर्चा करतात. तद्नंतर वार्षिक कार्यक्रमाच्या आकारमानाचे निश्चितीकरण "अर्थसंकल्प आकारमान व कार्यक्रम उप समिती" च्या मान्यतेने अंतिम करण्यात येते.

**१.३.** वार्षिक कार्यक्रम तयार करण्याच्या प्रक्रियेमध्ये कार्यक्रमावरील खर्चासाठी उपलब्ध असलेल्या साधनसंपत्तीचे मूल्यमापन करण्यासंदर्भात वित्त विभागाचाही सहभाग असतो. खालील ६ बाबींच्या आधारे साधनसंपत्तीचे मूल्यमापन केले जाते.

१) चालू महसुलातील शिल्लक.

२) सार्वजनिक उपक्रमाद्वारे अंशदान.

३) राज्य भविष्यनिर्वाह निधी.

४) खुल्या बाजारातील कर्जे.

५) संकीर्ण भांडवली आवक (निव्वळ).

६) अतिरिक्त अर्थबळ उभारणी.

**१.४.** राज्याकडे उपलब्ध असलेल्या साधनसंपत्तीचे क्षेत्रनिहाय वाटप करण्यापूर्वी त्यातून साध्य करावयाच्या भौतिक उद्दिष्टांचा प्रथम विचार करून त्या अनुरूप कार्यवाही करणे ही मूलत: नियोजन प्रक्रिया आहे. नियोजन प्रक्रियेत साधारणत: उपलब्ध साधनसंपत्ती, अपेक्षित उद्दिष्टे, उद्दिष्टपूर्तीसाठी आवश्यक बाबी व प्रत्यक्ष प्रगती या ४ टप्प्यांचा विचार करण्यात येतो.

**१.५.** राज्याच्या क्षेत्राचे संनियंत्रण, मूल्यमापन, फेरबदल व समायोजन या बाबी नियोजन प्रक्रियेत अंतर्भूत आहेत. विकासाच्या लाभाचे समान वाटप आणि जलदगती निश्चित करण्यासाठी योजनाबद्ध विकास हा नियोजन प्रक्रियेचा उद्देश आहे.

सन २०२६-२७ करिता राज्याच्या वार्षिक कार्यक्रमाचे आकारमान रु. २०८८८६.१६ कोटी इतके प्रस्तावित करण्यात आले आहे.

**(i) केंद्र पुरस्कृत/केंद्र सहाय्यित योजना** (Centrally Sponsored/ Centrally Assisted Schemes) :-

राज्यात राबविण्यात येणाऱ्या केंद्र पुरस्कृत योजनांचे सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (Public Finance Management System-PFMS) वरील केंद्रीय योजनांशी Mapping करण्यात आले आहे. केंद्र पुरस्कृत योजनांच्या निधीचे परिणामकारक व्यवस्थापन करण्याच्या तसेच निधी विनियोगाच्या प्रक्रियेत अधिक परिणामकारकता आणण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाने दिनांक ०१-०७-२०२१ पासून सुधारीत कार्यपद्धतीनुसार प्रत्येक केंद्र पुरस्कृत योजनेच्या अंमलबजावणीसाठी संबंधित प्रशासकीय विभागाने एका Single Nodal Agency (SNA) ची नेमणूक करून त्या योजनेसाठी एका Single Nodal Bank Account उघडणे व योजनेच्या समन्वयाच्या दृष्टीने किमान उप सचिव दर्जाच्या अधिकाऱ्याची Nodal Officer म्हणून नियुक्ती करावयाची आहे. राज्यात केंद्र पुरस्कृत योजनांचे चांगल्याप्रकारे संनियंत्रण करता यावे म्हणून नियोजन

विभागाच्या योजना माहिती व्यवस्थापन प्रणाली (MP-SIMS) वर Central Fund Distribution म्हणून Tab उपलब्ध करण्यात आला आहे.

नीति आयोग, नवी दिल्ली यांच्या दि. १७ ऑगस्ट, २०१६ च्या पत्रान्वये प्राप्त झालेल्या सूचनांनुसार अस्तित्वात असलेल्या ६६ केंद्र पुरस्कृत योजनांचे २८ छत्र योजनांमध्ये (Umbrella Schemes) एकत्रिकरण करण्यात आले असून त्यांची विभागणी पुढीलप्रमाणे आहे :-

**अ) गाभ्यामधील गाभा योजना** (Core of the Core Schemes) : या प्रवर्गात दर्शविण्यात आलेल्या एकूण ६ छत्र योजनांकरिता केंद्र शासनाकडून सध्या अस्तित्वात असलेल्या तरतुदीप्रमाणे केंद्रीय सहाय्य प्राप्त होत आहे.

**ब) गाभा योजना** (Core Schemes) : या प्रवर्गात दर्शविण्यात आलेल्या एकूण २० छत्र योजनांकरिता केंद्र शासनाकडून केंद्र : राज्य हिस्सा ६०:४० या स्वरुपात केंद्रीय सहाय्य प्राप्त होत आहे.

**क) पर्यायी योजना** (Optional Schemes) : या प्रवर्गात दर्शविण्यात आलेल्या एकूण २ छत्र योजनांकरिता केंद्र शासनाकडून केंद्र : राज्य हिस्सा ५०:५० या स्वरुपात केंद्रीय सहाय्य प्राप्त होत आहे.

**(ii) राज्य नियोजन मंडळ** : राज्य नियोजन मंडळाची स्थापना १९७२ साली करण्यात आली आहे. राज्य नियोजन मंडळाचे पदसिद्ध अध्यक्ष मा. मुख्यमंत्री आहेत. दिनांक १७ जून, २०१९ रोजी मा. श्री. राजेश क्षीरसागर यांची राज्य नियोजन मंडळाच्या "कार्यकारी अध्यक्ष" या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे.

**राज्य नियोजन मंडळाची सर्वसाधारण कार्ये पुढीलप्रमाणे आहेत :-**

(१) राष्ट्रीय विकास परिषदेचे निर्णय व मार्गदर्शक तत्त्वे यांच्या संदर्भात राज्य योजनेतील अग्रक्रम व लक्ष्ये ठरविण्याबाबत तसेच ही लक्ष्ये कालबद्ध पद्धतीने साध्य करण्यासाठी अवलंबावयाच्या धोरणाविषयी व नियोजनाचे तंत्र याबाबतीत शासनाला वेळोवेळी सल्ला देणे.

(२) योजनांतर्गत कार्यक्रमाच्या व प्रकल्पाच्या अंमलबजावणीचा आढावा घेणे व त्यात सुधारणा करण्याबाबत उपाययोजना सुचविणे.

(३) योजनांतर्गत योजनांचे / कार्यक्रमाचे मूल्यमापन व अभ्यास करण्याबाबत सल्ला देणे व याबाबतचा अहवाल तपासून अधिक कार्यक्षम अंमलबजावणीसाठी योग्य त्या शिफारशी करणे.

(४) राज्याच्या नियोजनाशी संबंधित महत्त्वाच्या प्रश्नावर शिफारशी करणे व शासनाकडून वेळोवेळी संदर्भित करण्यात येणाऱ्या इतर बाबींवर सल्ला देणे.

**iii) २० कलमी कार्यक्रम २००६ चे संनियंत्रण :**

केंद्र शासनाच्या सांख्यिकी व कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाने वीस कलमी कार्यक्रम १९८६ ची पूनर्रचना करून नवीन कार्यक्रमाची आखणी केली आहे. पुनर्रचित कार्यक्रमास वीस कलमी कार्यक्रम-२००६ असे संबोधण्यात आले आहे. या कार्यक्रमाखालील कलमे ही ग्रामीण व शहरी लोकांच्या हितासाठी आहेत. हा कार्यक्रम संपूर्ण देशातील गरीब व विशेष अधिकारापासून वंचित असलेल्या लोकांसाठी आहे. तसेच जनतेच्या राहणीमानात सुधारणा करणे व दारिद्र्य निर्मूलनाशी संबंधित कार्यक्रमावर भर देणारा आहे. सदर कार्यक्रम १ एप्रिल, २००७ पासून अंमलात आलेला आहे.

या कार्यक्रमात एकूण ६६ उप कलमांचा समावेश आहे, त्यापैकी २५ उपकलमे त्रैमासिक तत्त्वावर संनियंत्रणाकरिता निर्धारित करण्यात आली आहेत. उर्वरित उपकलमांचे संनियंत्रण वार्षिक तत्त्वावर होत आहे. उपरोक्त २५ उपकलमांचे संनियंत्रण सांख्यिकी व कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय, भारत सरकार यांच्यामार्फत त्रैमासिक तत्त्वावर करण्यात येत आहे. तर उर्वरित उपकलमांचे संनियंत्रण वार्षिक तत्त्वावर संबंधित प्रशासकीय केंद्रीय मंत्रालयामार्फत करण्यात येत आहे. त्रैमासिक संनियंत्रण होणाऱ्या कार्यक्रमात राज्याने केलेली प्रगती राज्याचा गुणानुक्रम ठरविण्यासाठी विचारात घेतली जाते.

वीस कलमी कार्यक्रमाची प्रत्यक्ष अंमलबजावणी संबंधित मंत्रालयीन विभागामार्फत केली जाते. त्याचे संनियंत्रण व पुनर्विलोकन राज्यस्तरावर नियोजन विभागामार्फत केले जाते. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार वीस कलमी कार्यक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणी व संनियंत्रणासाठी दि. २८ ऑगस्ट, २००७ रोजी राज्य, जिल्हा व तालुकास्तरावर समित्यांची स्थापना करण्यात आली आहे.

**२. जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण)** : राज्य योजना तयार करण्याची प्रक्रिया सुरू असतानाच सर्वसाधारण जिल्हा योजना तयार करण्यासंबंधी मार्गदर्शक तत्त्वे जिल्ह्यांना कळविली जातात. उपलब्ध साधन संपत्तीनुसार प्रत्येक जिल्ह्यास नियतव्ययाची मर्यादा कळविण्यात येते आणि त्यानुसार जिल्ह्यांनी जिल्हा योजना तयार करावयाची असते.

जिल्ह्यांकडून आलेल्या जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) च्या प्रारुप आराखड्यांवर मा. मंत्री (नियोजन) आणि जिल्हा नियोजन समितीचे प्रतिनिधी यांच्यामध्ये चर्चा होते आणि जिल्हा योजनांचा आकार निश्चित केला जातो. त्यानंतर जिल्हा योजनांचा यथोचितपणे राज्य योजनेत समावेश केला जातो. सन २०२६-२७ करिता रु. २१८६७ कोटी नियतव्यय मंजूर असून त्यापैकी ९५% चालू योजनांवर, ३.५% नाविन्यपूर्ण योजनांवर व ०.५ % मूल्यमापन, संनियंत्रण व डाटा एन्ट्रीकरिता, १% निधी जिल्हास्तरावर शाश्वत विकास ध्येय गाठण्यासाठी उपयोगात आणावा लागेल. जिल्हा योजनेच्या ९५% नियतव्ययापैकी आश्यकतेनुसार ५% अतिवृष्टी, पूर परिस्थिती, गारपीट आणि ५% टंचाईच्या परिस्थितीत करावयाच्या तातडीच्या उपाययोजना याकरिता खर्च करण्यास जिल्ह्याला मुभा दिली असून त्याप्रमाणे खर्च करणे आवश्यक आहे.

सन २०२५-२६ पासून जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) मधील मंजूर नियतव्ययापैकी किमान २५ टक्के निधी जिल्हा विकास आराखडा अंतर्गत वार्षिक कृती आराखडा यात निश्चित करण्यात आलेली क्षेत्रे व उपक्षेत्रे संबंधित बाबींकरिता वापरण्याबाबत सर्व जिल्ह्यांना सूचित केले आहे.

**३. अर्थ व सांख्यिकी संचालनालय :**

**३.१** राज्य शासनाच्या विविध विभागांकडून राबविल्या जाणाऱ्या योजना/कार्यक्रम यांचा मुख्य उद्देश कितपत साध्य झाला, योजनेचे लाभ योग्य वेळी व योग्य प्रमाणात मिळाले किंवा कसे, योजनेची अंमलबजावणी योग्य प्रकारे होत आहे किंवा कसे तसेच योजनेच्या अंमलबजावणीमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे काय? इत्यादी बाबत माहिती शासनास उपलब्ध व्हावी व योजना/कार्यक्रमाचा अद्ययावत प्रतिसाद वेळोवेळी उपलब्ध व्हावा या उद्देशाने योजना/कार्यक्रमांच्या मूल्यमापनाचे काम अर्थ व सांख्यिकी संचालनालयाकडून करण्यात येते. तसेच बाह्यस्थ संस्थांकडून देखील काही विषयांचा मूल्यमापन अभ्यास करण्यात येतो.

**३.२** सन २०२४-२५ मध्ये खालील योजनांचे मूल्यमापन अभ्यास अहवाल राज्य शासनास सादर करण्यात आले आहेत.

१) दिनदयाळ अंत्योदय योजना- राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान

२) राज्यस्तरिय नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत अंशत: ठाणबंद पद्धतीने शेळी पालनाद्वारे शेतकऱ्यांना पूरक उत्पन्न मिळवून देणे (१०+१) (सर्वसाधारण+अनुसूचित जाती उपयोजना)

**३.३** सन २०२५-२६ मध्ये खालील योजनांचे मूल्यमापन अभ्यास अहवाल तयार करण्यात आले.

१) राज्यातील अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना आदिवासी योजनेच्या अंतर्गत (पेसा) ५ टक्के अबंध निधी देण्याबाबत योजना.

२) अल्पसंख्याकबहुल शासनमान्य खाजगी शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, अपंग शाळा व औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांमध्ये पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना.

३) श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तिवेतन योजना.

४) राज्यस्तरिय नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत राज्यात दूध उत्पादनास चालना देण्यासाठी ६/४/२ दुधाळ संकरीत गायी/म्हशीचे गट वाटप करणे. (सर्वसाधारण+अनुसूचित जाती उपयोजना)

५) राज्यस्तरिय नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत हजार मांसल कुक्कुट पक्षी संगोपनाद्वारे कुक्कुटपालन व्यवसाय सुरू करणे. (सर्वसाधारण+अनुसूचित जाती उपयोजना)

६) स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण)

नियोजन विभागाच्या दि. १२ सप्टेंबर, २०२४ च्या शासन निर्णयान्वये योजनांचा मूल्यमापन अभ्यास/प्रकार अभ्यास/सर्वेक्षण/इतर पाहण्या घेणे तसेच सांख्यिकी व आर्थिक विषयांबाबत तज्ज्ञ सेवा पुरविणे यासाठी बाह्यस्थ संस्थांची नामिका सूची प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

**३.४**. सन २०२५-२६ मध्ये खालील योजनांच्या मूल्यमापन अभ्यासाचे काम सुरु आहे.

१. एकात्मिक महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना,

२. प्रधानमंत्री आवास योजना (शहरी).

**३.४** (अ) राज्यातील सांख्यिकी यंत्रणेचे क्षमतावर्धन करणे व विश्वासार्हता वाढविणे या उद्देशाने सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय, भारत सरकार यांनी राष्ट्रीय सांख्यिकी आयोगाच्या शिफारशीनुसार `सांख्यिकी सक्षमीकरणासाठी सहाय्य' ही योजना सुरु केली. सदर योजना राज्यात राबविण्याकरिता केंद्र शासनाच्या सांख्यिकी आणि कार्यक्रम कार्यान्वयन मंत्रालय आणि नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला आहे. अर्थ व सांख्यिकी संचालनालयामार्फत `सांख्यिकी सक्षमीकरणासाठी सहाय्य' ही केंद्रीय क्षेत्र योजना राबविण्यासाठी तयार करण्यात आलेला आराखडा केंद्रीय सांख्यिकी कार्यालयाने मंजूर केला आहे. या आराखड्यानुसार केंद्र शासनाने मंजूर केलेल्या रु. ११.०० कोटी निधीपैकी प्राप्त होणारा निधी मार्च २०२६ पर्यंत खर्च करण्यात येईल.

**३.५** सांख्यिकी संग्रहण अधिनियम, २००८ (सन २००९ चा ७) च्या कलम ३३ खाली तयार करण्यात आलेल्या सांख्यिकी संग्रहण नियम, २०११ मधील नियम ३, उप नियम (२) अनुसार प्रदान केलेल्या शक्तीनुसार महाराष्ट्र शासनाने या नियमांखाली अधिकार व कर्तव्ये बजावण्याकरिता संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांना "नोडल अधिकारी" म्हणून घोषित केले आहे.

३.६ महाराष्ट्र शासनाच्या नियोजन प्रक्रियेचे संगणकीकरण करण्यात आले आहे. नियोजन प्रक्रिया जलद व पारदर्शी होण्याच्या दृष्टीने नियतव्यय वितरण, खर्च सनियंत्रण व वार्षिक योजना प्रकाशने यासाठी महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागाकडून अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या सहकार्याने "महाराष्ट्र योजनांतर्गत योजना माहिती व्यवस्थापन प्रणाली (MPSIMS)" ही आज्ञावली विकसित करण्यात आली आहे. जनतेच्या व सर्व विभागांच्या वापराच्या सुलभतेसाठी MPSIMS करिता स्वतंत्र संकेतस्थळ विकसित (https://mahades.maharashtra.gov.in) करण्यात आले आहे.

**४. महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र (महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ॲप्लिकेशन सेंटर) :**

भारतीय तसेच विदेशी बहुउद्देशीय उपग्रहाद्वारे प्राप्त होणाऱ्या पृथ्वीच्या छायाचित्रांचे विश्लेषण रिमोट सेन्सिंग या अत्याधुनिक व प्रगत तंत्रज्ञानाचे सहाय्याने करून त्याचा नैसर्गिक साधन-संपत्तीचा विकास जलदगतीने करण्यासाठी उपयोग केला जातो. सुदूर संवेदन तंत्रज्ञानाचे महत्त्व लक्षात घेऊन राज्य शासनाने १९८८ मध्ये नागपूर येथे नियोजन विभागाच्या नियंत्रणाखाली महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ॲप्लिकेशन सेंटर, नागपूर या स्वायत्त संस्थेची स्थापना केली. केंद्राची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत :

* रिमोट सेन्सिंग तंत्रज्ञानाचा वापर हा विविध क्षेत्रात कसा उपयोगी आहे याबाबत जाणीव निर्माण करुन त्या तंत्रज्ञानाचा महाराष्ट्र राज्यात विकास करणे,

* नैसर्गिक संपत्तीबाबत उपलब्ध माहितीची विश्वासार्हता वाढविणे,

* रिमोट सेन्सिंग तंत्रज्ञानाच्या वृद्धीसाठी व त्याच्या योग्य वापरासाठी माहिती व सल्ला देणारी संस्था म्हणून काम करणे,

* नैसर्गिक संपत्तीबाबतच्या माहितीचे सघन पद्धतीने व्यवस्थापन करण्यासाठी लोकांना प्रवृत्त करणे, या तंत्रज्ञानाचा वापर करू इच्छिणाऱ्या संस्थांना योग्य मार्गदर्शन, प्रत्यक्ष शिक्षण व प्रशिक्षण देणे,

* रिमोट सेन्सिंगद्वारा उपलब्ध माहिती संकलित करणे व ही माहिती संबंधित शासकीय विभागांना गरजेनुसार उपलब्ध करून देणे,

* राज्याच्या साधन-संपत्तीचे नकाशे आवश्यकतेनुसार तयार करणे, इत्यादी.

* राज्यातील नैसर्गिक साधन संपदेविषयीचा अभ्यास, विकास आराखडे तसेच नियंत्रणविषयक बाबींच्या अभ्यासास उपयुक्त अशा सर्व साधनसुविधा आणि संगणक इत्यादींबाबत हे केंद्र परिपूर्ण आहे.

* या केंद्राकडून सुदूर संवेदन तंत्रज्ञान आणि भौगोलिक माहिती प्रणालीबाबत जाणीव निर्माण करण्याकरिता या विषयावर विविध कार्यालयांसाठी वेळोवेळी प्रशिक्षणे, चर्चासत्र, कार्यशाळा इत्यादी आयोजित केली जातात.

* MRSAC ने राबविलेल्या प्रकल्पांमध्ये भौगोलिक माहिती प्रणाली (GIS) आधारित रस्ते माहिती प्रणाली, नगररचना प्रादेशिक योजना, जलयुक्त शिवार व पाणलोट विकास योजना, डोंगरी विकास योजना, ई-पंचनामा, महाॲग्रीटेक, कांदळवन अभ्यास, भूजल व्यवस्थापन, खनिज व खाणींचा अभ्यास इत्यादींचा समावेश आहे.

* महाराष्ट्र शासनाने सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी रु. ३०.६२१ कोटींची अर्थसंकल्पीय तरतूद केली असून सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी प्रस्तावित अर्थसंकल्पीय तरतूद रु. ३९.५१५ कोटी इतकी आहे.

**५. महाराष्ट्र जिओटेक्नॉलॉजी ॲप्लिकेशन सेंटर (महाजिओटेक) :**

सहा दशकांहून अधिक काळापासून भू-स्थानिक तंत्रज्ञानाचा (Geospatial Technology) वापर जागतिक स्तरावर केला जात आहे. या तंत्रज्ञानाचा विनियोग विविध क्षेत्रांत होत असून धोरणात्मक नियोजन आणि निर्णय घेण्यासाठी प्रभावीपणे उपयोग केला जात आहे. नैसर्गिक संसाधन मॅपिंग, प्रशासन, नियोजन, देखरेख, मूल्यांकन आणि निर्णय घेण्याच्या दृष्टीकोनातून MRSAC ने राबविलेल्या प्रमुख प्रकल्पांमध्ये AI-ML, IOT, क्लाउड कॉम्प्युटिंग, WEB सेवा आणि अँड्रॉइड आणि मोबाइल तंत्रज्ञान यासारख्या आधुनिक आयटी साधनांचा उदय आणि रिमोट सेंन्सिग तंत्रज्ञानाचे आगमन झाले. त्यामुळे प्रशासनातील भू-स्थानिक तंत्रज्ञान क्षेत्राची व्याप्ती, भूमिका आणि जबाबदाऱ्यांमध्ये आमूलाग्र बदल झाले आहेत. या अनुषंगाने भू-स्थानिक तंत्रज्ञान (Geospatial Technology) चा वापर करुन प्रशासनात गतिमानता आणण्याकरिता नियोजन विभागाच्या अखत्यारित `महाराष्ट्र जिओटेक्नॉलॉजी ॲप्लिकेशन सेंटर' नावाची स्वतंत्र संस्था कंपनी अधिनियम २०१३ मधील कलम ८ अंतर्गत स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

महाजिओटेकद्वारे राज्याच्या आर्थिक विकासासाठी राष्ट्रीय भू-स्थानिक धोरण २०२२, बाथिमेट्रिक भू-स्थानिक डेटा, खोल समुद्र सर्वेक्षण जसे की ब्लू-इकॉनॉमी, भू-स्थानिक ज्ञान उपक्रम, शाश्वत विकास ध्येय साध्य करणे, एनजीडीआर-यूजीआय (National Geospatial Data Registry-Unified Geospatial Interface) इत्यादी सारख्या राष्ट्रीय स्तरावरील उपक्रमांची जलद अंमलबजावणी करण्यात येईल. MRSAC ही संस्था महाजिओटेकच्या प्रशासकीय आधिपत्याखाली आणून विद्यमान व्यवस्थेचे बळकटीकरण करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

राज्यात विज्ञान आणि तंत्रज्ञानावर आधारीत शाश्वत नियोजन प्रक्रियेद्वारे Ease of Doing Business व Citizen Friendly प्रशासनास प्रोत्साहन देणे, जागतिक भू-स्थानिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने बहुस्तरिय गाव/तालुका/जिल्हा/राज्य/राष्ट्रीय पातळीवरील प्रगतीचे नियोजन कार्यक्षम व प्रभावी पद्धतीने करुन प्रकल्पाचा खर्च कमी करणे व वेळेची बचत करणे, पीएम गति-शक्तीमध्ये अपेक्षित असलेली बहु-क्षेत्रीय एकात्मता सुनिश्चित करणे या बाबी साध्य करण्यासाठी महाजिओटेक अंतर्गत खालीलप्रमाणे ५ विभाग स्थापन करण्यात येणार आहेत :-

१. महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र

२. आधुनिक तंत्रज्ञान विभाग

३. संशोधन व प्रशिक्षण विभाग

४. भूस्थानिक नवोपक्रम व उद्योजकता विभाग

५. प्रशासन व लेखा विभाग

महाजिओटेकसाठी सन २०२६-२७ या वर्षासाठी प्रस्तावित अर्थसंकल्पीय तरतूद रु. ३०.०० कोटी इतका आहे.

**६. विकास मंडळे** : राज्य विधिमंडळाने पारित केलेला ठराव स्वीकृत करून दिनांक ९ मार्च, १९९४ रोजी राष्ट्रपतींनी प्रसृत केलेल्या आदेशाद्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांवर विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्राकरिता विकास मंडळे स्थापन करण्याची विशेष जबाबदारी घटनेच्या अनुच्छेद ३७१(२) अन्वये सोपविली. राष्ट्रपतींच्या उपरोक्त आदेशाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्राच्या राज्यपालांनी दिनांक ३० एप्रिल, १९९४ रोजी विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळे आदेश-१९९४ निर्गमित करून विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्राकरिता दि. १ मे १९९४ रोजी विकास मंडळे स्थापन केली.

या विकास मंडळांना मा. राष्ट्रपती महोदयांनी ०१.०५.१९९९ ते ३०.०४.२०२० या कालावधीकरिता वेळोवेळी मुदतवाढ दिली. विकास मंडळाची सदर मुदत दि. ३० एप्रिल, २०२० रोजी संपुष्टात आली.

दि. २७.०९.२०२२ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळांचे पुनर्गठन करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला असता, मा. मंत्रिमंडळाने सदरहु विकास मंडळाचे पुनर्गठन करण्यास व मा. राज्यपाल महोदयांमार्फत

विकास मंडळे पुनर्गठित करण्याबाबत केंद्र शासनास विनंती करण्यास मान्यता दिली. तसेच सदरहु विकास मंडळांना वैधानिक विकास मंडळे संबोधण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार उपरोक्त विकास मंडळे पुनर्गठित करण्याची विनंती मा. राज्यपाल, महाराष्ट्र यांच्या दि. २८.१०.२०२२ च्या अ.शा. पत्रान्वये मा. गृह मंत्री, भारत सरकार यांना करण्यात आली आहे. त्याबाबत केंद्र शासनाकडे वेळोवेळी पाठपुरावा करण्यात येत आहे.

**७. डोंगरी विभाग विकास कार्यक्रम :**

डोंगरी विभाग विकास कार्यक्रमांतर्गत निश्चित केलेले डोंगरी क्षेत्र/ अनुज्ञेय कामांबाबत सर्वसमावेशक सूचना तसेच राज्यातील २२ जिल्ह्यांतील ७३ तालुके (पूर्णत:) व ३५ तालुके (अंशत:) यांना डोंगरी क्षेत्र म्हणून दि. १८.०१.२०१० रोजीच्या शासन निर्णयान्वये घोषित केले होते. तद्नंतर शासनाने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या तरतुदीप्रमाणे नवीन तालुक्यांची निर्मिती केल्यामुळे, अस्तित्वातील डोंगरी तालुक्यांच्या विभाजनाने नव्याने निर्माण झालेल्या दोडामार्ग, त्र्यंबकेश्वर, माहूर या तीन पूर्णगट व विक्रमगड, देवळा, फुलंब्री या तीन उपगट तालुक्यांचा डोंगरी विभाग विकास कार्यक्रमात दि. १५.६.२०१८ च्या शासन निर्णयान्वये समावेश करण्यात आला आहे. त्यानुसार डोंगरी विभाग विकास कार्यक्रमा अंतर्गत २२ जिल्ह्यांतील ७६ तालुके (पूर्णत:) व ३८ तालुके (अंशत:) समाविष्ट आहेत.

**२.** डोंगरी विभाग विकास कार्यक्रमांतर्गत राज्याच्या काही तालुक्यांचा/ गावांचा डोंगरी क्षेत्रात समावेश करावा म्हणून लोकप्रतिनिधींची सातत्याने मागणी होत असते. डोंगरी विभाग विकास कार्यक्रमाची व्याप्ती वाढविण्याबाबत निर्णय घेण्यासाठी मा. मंत्री, ग्रामविकास यांच्या अध्यक्षतेखाली डोंगरी विभाग विकास कार्यक्रम मंत्रिमंडळ उपसमिती दि. २२.१२.२०२२ च्या शासन निर्णयान्वये गठित करण्यात आली होती. त्या अनुषंगाने महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र, नागपूर (MRSAC) या वैज्ञानिक संस्थेकडून Digital Elevation Model (DEM) या अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने केवळ क्षेत्रफळाची अट शिथील करून कोणत्या तालुक्यांचा समावेश डोंगरी उपगट तालुक्यांमध्ये करता येईल, याबाबत अभ्यास करण्यात आला.

**३.** डोंगरी विभाग विकास कार्यक्रम सर्वसमावेशक होण्याच्या दृष्टीने राज्यातील डोंगरी विभागाचे क्षेत्र मंत्रिमंडळ उपसमितीच्या शिफारशींनुसार विशिष्ट निकषांच्या आधारे निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार एखाद्या भौगोलिक भागास डोंगरी भाग समजण्यासाठी पुढील सुधारीत अटी पूर्ण होणे आवश्यक आहे.

**(एक) प्रमुख डोंगरी भाग - ज्या भौगोलिक क्षेत्राची सापेक्ष उंची ३०० मीटरहून जास्त आहे व सरासरी उतार ३० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त आहे असे क्षेत्र.**

**(दोन) अंशत: डोंगरी भाग - ज्या भौगोलिक क्षेत्राची सापेक्ष उंची ३०० मीटरहून जास्त आहे व उतार हा १७ ते ३० टक्के असल्यास असे क्षेत्र.**

एखाद्या तालुक्यात वरील अटी पूर्ण करणाऱ्या डोंगरी भागाचे क्षेत्रफळ तालुक्याच्या भौगोलिक क्षेत्रफळाच्या ५०% किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास तो तालुका पूर्णगट डोंगरी तालुका समजण्यात येईल. तसेच एखाद्या तालुक्यात वरील अटी पूर्ण करणाऱ्या डोंगरी भागाचे क्षेत्रफळ तालुक्याच्या भौगोलिक क्षेत्रफळाच्या ५०% पेक्षा कमी असल्यास तो तालुका उपगट डोंगरी तालुका समजण्यात येईल. पूर्णगट डोंगरी तालुक्यामध्ये त्या तालुक्यातील सर्व गावांचा समावेश होईल. उपगट डोंगरी तालुक्यामध्ये ज्या गावाचे डोंगरी क्षेत्रफळ हे त्या गावाच्या एकुण भौगोलिक क्षेत्रफळाच्या १०% किंवा त्यापेक्षा अधिक असेल अशाच गावांचा समावेश होईल. त्यानुसार प्रस्ताव मा. मंत्रिमंडळ उपसमितीसमोर सादर करण्यात आला. सदर समितीच्या बैठकीमध्ये MRSAC च्या अहवालाप्रमाणे नवीन ६४ उपगट तालुक्यांचा डोंगरी विभाग विकास कार्यक्रमात समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच मंडणगड या उपगट तालुक्याचा पूर्णगट तालुक्यात समावेश करण्याचा देखील निर्णय घेण्यात आला. त्यानुसार नव्याने समाविष्ट होणाऱ्या तालुक्यांतील गावांच्या नावांची पडताळणी करून प्रस्ताव शासनाच्या अंतिम मान्यतेसाठी सादर करण्यात आला. त्यास अंतिम मान्यता दिल्यानंतर दि. १३-०३-२०२४ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून त्यानुसार डोंगरी विभाग विकास कार्यक्रमांतर्गत राज्यातील २८ जिल्ह्यातील ७७ पूर्णगट डोंगरी तालुके व १०१ उपगट डोंगरी तालुके समाविष्ट आहेत. दि. १७.०७.२०२५ च्या शासन निर्णयान्वये दि. १३.०३.२०२४ च्या शासन निर्णयातील परिशिष्ट 'ब' सुधारित करण्यात आले आहे.

**४.** डोंगरी विभाग विकास कार्यक्रमांतर्गत कार्यक्रमाची आखणी व अंमलबजावणी योग्यप्रकारे व्हावी यासाठी दि. ०१ नोव्हेंबर, २०१० रोजीच्या शासन निर्णयान्वये संबंधित जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक स्वतंत्र समिती नेमण्यात आली आहे. या योजनेखाली अनुज्ञेय असलेल्या कामांपैकी समिती कामांची शिफारस करु शकते. या योजनेखाली अनुज्ञेय असणाऱ्या प्रत्येक कामासाठी रु. २५.०० लाखाची मर्यादा दि. १३.०३.२०२४ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आली आहे.

**५.** सन २०२५-२६ या वित्तीय वर्षापासून डोंगरी विभाग विकास कार्यक्रमासाठी केंद्र शासनाच्या "खासदार स्थानिक विकास कार्यक्रम" संदर्भातील "ई-साक्षी" पोर्टलच्या धर्तीवर "डोंगरी विभाग विकास कार्यक्रम" अंतर्गत कामांची शिफारस करण्यापासून अंतिम देयक अदा करण्याच्या सर्व प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने पार पाडण्यासाठी "ई-समर्थ" (e-Samarth) ही नवीन संगणकीय प्रणाली दि. ३०.०९.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये लागू करण्यात आली आहे.

**६.** सन २०२१-२२ या आर्थिक वर्षापासून निधीमध्ये वाढ करण्यात आली असून, नियोजन विभाग, शासन निर्णय क्र.डोंविका-२०२०/ प्र.क्र.५३/का.१४८१-अ, दि. २६.०२.२०२१ अन्वये "पूर्णगट" डोंगरी तालुक्यासाठी "रु. २.०० कोटी" आणि "उपगट" डोंगरी तालुक्यासाठी रु. "१.०० कोटी" निधी मंजूर करण्यात आला आहे.

**७.** डोंगरी विभाग विकास कार्यक्रमांतर्गत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी रु. २५५.०० कोटी नियतव्यय मंजूर असून वर्ष २०२६-२७ साठी रु. २५५.०० कोटी इतकी अर्थसंकल्पिय तरतूद प्रस्तावित आहे.

**८. छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे :**

छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे या संस्थेची स्थापना कंपनी कायदा २०१३ च्या कलम ८ अंतर्गत राज्य शासनाची स्वायत्त संस्था म्हणून झालेली आहे. प्रत्यक्षात सदर संस्था दिनांक ११/०२/२०१९ पासून कार्यान्वित झाली आहे. ही संस्था "ना नफा ना तोटा" या तत्त्वावर लक्ष्यित गटातील मराठा, कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी प्रवर्गाच्या सामाजिक शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी कार्यरत आहे. संस्थेकडे सध्या स्वत:चे कोणतेही इतर उत्पन्नाचे स्रोत नसल्यामुळे ती शासनाच्या अनुदानावर कार्यरत आहे.

**सन २०१८-१९ पासून या संस्थेस पुढीलप्रमाणे शासन अनुदान प्राप्त असून खर्च पुढीलप्रमाणे आहे.**

| आर्थिक वर्ष | मंजूर अनुदान (कोटी) | वितरित अनुदान (कोटी) | मागील वर्षाची शिल्लक रक्कम (कोटी) | खर्च (कोटी) |
|---|---|---|---|---|
| २०१८-१९ | ५.०० | ५.०० | २.५१ | २.४८ |
| २०१९-२० | ५०.०० | २८.८० | ८.२३ | २३.०८ |
| २०२०-२१ | १३०.०० | ३३.६५ | १५.३७ | २६.५० |
| २०२१-२२ | २९५.४५ | २९५.४५ | २२१.६६ | ८८.९६ |
| २०२२-२३ | ३००.०० | १६९.७३ | २६०.५६ | १३०.८३ |
| २०२३-२४ | ३००.०० | २२०.७४ | १०४.५४ | ३७६.२० |
| २०२४-२५ | ३००.०० | २९८.२४ | ६४.२० | ३६१.१९ |
| २०२५-२६ | ५१५.८५ | ३०६.०० | ०.७३ | २९४.१० (माहे सप्टेंबर, २०२५ अखेर) |

**चालू वर्ष २०२५-२६ मध्ये राबविण्यात येणाऱ्या योजना खालीलप्रमाणे : लाभार्थी**

* संघ लोकसेवा आयोग नागरी सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण उपक्रम - १००९
* संघ लोकसेवा आयोग मुख्य परीक्षा एकरकमी आर्थिक सहाय्य - ११४
* संघ लोकसेवा आयोग मुलाखत परीक्षा एकरकमी आर्थिक सहाय्य - ३१
* महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राज्य सेवा) परीक्षा पूर्व प्रशिक्षण उपक्रम - ७५०
* महाराष्ट्र लोकसेवा आयोग अभियांत्रिकी सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण उपक्रम - ३००
* महाराष्ट्र लोकसेवा आयोग न्यायिक सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण उपक्रम - ११४
* महाराष्ट्र लोकसेवा आयोग राज्य सेवा मुख्य परीक्षा एकरकमी आर्थिक सहाय्य - २४०८
* महाराष्ट्र लोकसेवा आयोग मुलाखत परीक्षा एकरकमी आर्थिक सहाय्य - ७५३
* आय.बी.पी.एस. परीक्षा पूर्व प्रशिक्षण उपक्रम - २०००
* कर्मचारी निवड आयोग (अराजपत्रित) परीक्षा पूर्व प्रशिक्षण उपक्रम - ५००
* छत्रपती संभाजी महाराज सारथी युवा व्यक्तिमत्व विकास व संगणक प्रशिक्षण कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम (CSMS-DEEP) - ४००००
* श्रीमंत मालोजीराजे भोसले सारथी कौशल्य विकास प्रशिक्षण (इंडो जर्मन टुल रूम) - ९५०
* राजमाता जिजाऊ सारथी कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम : MSSDS - २०००
* मोडी लिपी प्रशिक्षण - २१०
* मुख्यमंत्री विशेष संशोधन अधिछात्रवृत्ती (CMSRF)-२०१९ - १४६
* छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (CSMNRF)-२०१९ - ३५७
* छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (CSMNRF)-२०२० - २०४
* छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (CSMNRF)-२०२१ - ५५१
* छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (CSMNRF)-२०२२ - ८५१
* छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (CSMNRF)-२०२४ - १००
* महाराजा सयाजीराव गायकवाड - सारथी परदेशातील उच्च शिक्षणासाठी गुणवंत मुला-मुलींना शिष्यवृत्ती - ७५
* डॉ पंजाबराव देशमुख - सारथी उच्च शिक्षण देशांतर्गत शिष्यवृत्ती योजना - ७४९
* मातोश्री मुलींचे वसतिगृह संकुल योजना (नाशिक) - ७५
* कृत्रीम रेतन व मुरघास प्रशिक्षण - १०
* शेतकरी उत्पादक कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO)/ संचालक यांना प्रशिक्षण (महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ,पुणे (MCDC) - २७
* उदयोन्मुख कृषी औद्योगिक क्षेत्रातील रोजगार संधी संलग्न शैक्षणिक कार्यक्रम - २२
* सेनापती धनाजी जाधव शेतकरी ड्रोन प्रशिक्षण कार्यक्रम- १०५
* महिलांकरिता MCED चे कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम - २०००
* युवकांसाठी COEP मार्फत कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम- १०००

* सरसेनापती संताजी घोरपडे उद्योजकता विकास (इनक्युबेशन) उपक्रम च्या सहकार्यातून नवउद्योग कल्पना विकसनाकरिता अर्थसहाय्य - ७९
* मधुमक्षिका पालन प्रशिक्षण कार्यक्रम - ०३

आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी अर्थसंकल्पीय तरतूद शासकीय कर्मचारी व अधिकारी वेतन रु.८.२५ कोटी, बाह्यस्रोत कर्मचारी वेतन रु. ७.५० कोटी व वेतनेतर अनुदान रु. ३०० कोटी व देशांतर्गत प्रवास खर्चाकरिता रुपये १०.०० लक्ष आणि इमारत बांधकामासाठी रु. २०० कोटी असे एकूण रक्कम रुपये ५१५.८५ कोटी आहे. वर्ष २०२६-२७ साठी रु. ५००.०० कोटी इतकी अर्थसंकल्पिय तरतूद प्रस्तावित आहे.

**तसेच या व्यतिरिक्त सारथी संस्थेमार्फत खालील योजना प्रस्तावित आहेत.**

* सरदार सूर्याजी काकडे सारथी वाहन-चालक कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम-IDTR-१५०००
* कृषि विज्ञात केंद्रामार्फत अल्पमुदतीचे कृषि तंत्रज्ञान प्रशिक्षण कार्यक्रम-१४८

**९. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ**

राज्यातील आर्थिकदृष्ट्या मागास समाजाचा सामाजिक विकास करण्याकरिता व आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या गटातील युवकांना स्वयंरोजगारासाठी अर्थ सहाय्य व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने दि. २७ नोव्हेंबर, १९९८ रोजी कंपनी कायद्याखाली नोंदणी करून अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाची स्थापना केली. महामंडळाच्या स्थापनेपासूनचे भागभांडवल रु. ५० कोटीचे होते. सन २०१८ नंतर महामंडळास आजपर्यत रु. १३९०.०० कोटींचा निधी प्राप्त झालेला आहे.

शासन निर्णय क्र. अपाम २०१७/प्र.क्र.१८९/रोस्वरो-१, दिनांक २१ नोव्हेंबर, २०१७ अन्वये महामंडळाच्या जुन्या योजना बंद करून नवीन तीन सुधारीत योजना राबविण्यासाठी मान्यता देण्यात आली आहे. दिलेल्या मान्यतेनुसार या सुधारीत योजनांची अंमलबजावणी दिनांक ०२ फेब्रुवारी, २०१८ पासून www.udyog.mahaswayam.gov.in या वेबप्रणालीद्वार पूर्णपणे ऑनलाईन स्वरुपात सुरू करण्यात आली आहे.

**योजनांची माहिती खालीलप्रमाणे :**

**१. वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना (IR-I)**

मा. मंत्रिमंडळ उपसमिती व संचालक मंडळाच्या निर्णयानुसार या योजनेची मर्यादा रु. १० लाखाहून रु. १५ लाखापर्यत वाढविलेली असून, रु. १५ लाखाच्या मर्यादेतील प्रकरणांना जास्तीत-जास्त ७ वर्षाच्या कालावधीकरिता रु. ४.५ लाखापर्यंत व्याज परतावा करण्यात येईल.

मात्र दिनांक २० मे, २०२२ पूर्वीच्या L.O.I. धारकांना नियमानुसार रु. १० लाखाच्या मर्यादेतील व्याज परतावा करण्यात येणार असून त्याकरिता रु. ३ लाखाची मर्यादा असेल. हा व्याज परतावा कालावधी जास्तीत-जास्त ५ वर्ष व व्याजाचा दर जास्तीत-जास्त द.सा.द.शे. १२% असेल. या योजने अंतर्गत लाभार्थ्यांनी मात्र बँकेमार्फत कर्ज घेतलेले असावे व ते फक्त व्यवसायिक तथा उद्योगाच्या दृष्टीने मंजूर झालेले असावे.

| वर्ष | पात्रता प्रमाणपत्र धारक (LOI) संख्या | बँकेमार्फत वाटप | | महामंडळामार्फत वाटप | |
|---|---|---|---|---|---|
| | | लाभार्थी संख्या | वितरीत कर्ज रक्कम | लाभार्थी संख्या | व्याज परतावा वितरीत रक्कम |
| २०२३-२४ | ४६४१० | २९९०३ | २७८६.८६ कोटी | २५६१९ | ३३२.१४ कोटी |
| २०२४-२५ | ३१२९२ | ४४९८७ | ४१६३.८६ कोटी | ३०१७७ | ३३०.७८ कोटी |
| २०२५-२६ | १७४८० | २८११७ | २४५०.९४ कोटी | ३२४२० | ३४९.५९ कोटी |

**२. गट कर्ज व्याज परतावा योजना (IR-II)**

या योजने अंतर्गत किमान दोन किंवा दोन पेक्षा अधिक व्यक्तींच्या गटाने एकत्र येऊन,

* दोन व्यक्तींसाठी कमाल रु. २५ लाखांच्या मर्यादेवर,
* तीन व्यक्तींसाठी रु. ३५ लाखांच्या मर्यादेवर,
* चार व्यक्तींसाठी रु. ४५ लाखांच्या मर्यादेवर व
* पाच व पाचपेक्षा अधिक व्यक्ती असल्यास रु. ५० लाखांपर्यंतच्या

नॉन-क्रिमिलेअरकरिता असलेल्या कौटुंबिक वार्षिक उत्पन्न मर्यादेत (सक्षम प्राधिकरणाने वेळोवेळी दिलेल्या प्रमाणपत्रानुसार) असलेल्या उमेदवारांच्या गटासंदर्भात, बँकेकडून प्रती गटास कमीत कमी रु. १०.०० लाख ते जास्तीत जास्त रु. ५०.०० लाखापर्यंतच्या देण्यात आलेल्या उद्योग उभारणी कर्जावर ५ वर्षापर्यंत अथवा कर्ज कालावधी यापैकी जे कमी असेल ते, कर्ज मंजूर केलेल्या गटाने वेळेत कर्जाचे हप्ते भरल्यास, हप्ता भरल्यावर जास्तीत जास्त १२ टक्के व्याज दराच्या आणि रु. १५.०० लाखाच्या मर्यादेत त्यातील व्याजाची रक्कम लाभार्थ्याच्या बँक खात्यात दरमहा महामंडळामार्फत जमा करण्यात येईल.

* या योजनेमध्ये FPO गटांनी त्यांच्या शेतीपूरक व्यवसायाकरिता बँकेमार्फत घेतलेल्या कर्जावरील व्याज परतावा देखील नियमानुसार महामंडळ करेल.

| वर्ष | पात्रता प्रमाणपत्र धारक (LOI) संख्या | बँकेमार्फत वाटप | | महामंडळामार्फत वाटप | |
|---|---|---|---|---|---|
| | | लाभार्थी संख्या | वितरित कर्ज रक्कम | लाभार्थी संख्या | व्याज परतावा वितरित रक्कम |
| २०२३-२४ | १३४ | ३६६ | ११९.७९ कोटी | २६० | ८.१३ कोटी |
| २०२४-२५ | २२७ | ३६६ | १२३.०८ कोटी | ३१६ | ११.३२ कोटी |
| २०२५-२६ | १९४ | २४२ | ८०.९२ कोटी | २२२ | ८.८४ कोटी |

**३. गट प्रकल्प कर्ज योजना (GL-I)**

या योजने अंतर्गत शेतकरी उत्पादक गट (FPC) (Farmer Producer Company) गटांना रु. १० लाखाच्या मर्यादेत बिनव्याजी कर्ज वितरित करण्यात येत होते. मात्र सदर योजने अंतर्गत लाभार्थी गटांची कर्जाची परतफेड करण्याकरिता असलेली उदासिनता पाहून, सदर योजना दि. १० जानेवारी, २०२२ रोजीच्या मा. उपमुख्यमंत्री महोदय यांच्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार तात्पुरत्या स्वरुपात स्थगित करण्यात आली आहे.

| वर्ष | महामंडळाकडे दाखल झालेली प्रकरणे | महामंडळाने केलेले वाटप | |
|---|---|---|---|
| | | मंजूर केलेली कर्ज प्रकरणे | वाटप केलेली कर्ज रक्कम |
| २०२१-२२ पर्यंत | ४५ | ३४ | ३.३० कोटी |
| २०२२-२३ | ० | १ | ५ लाख |

**वर्ष २०२५-२६ साठी रु. ७५०.०० कोटी एवढी तरतूद करण्यात आली असून वर्ष २०२६-२७ साठी रु. ७५०.०० कोटी इतकी अर्थसंकल्पिय तरतूद प्रस्तावित आहे.**

**१०. शाश्वत विकास ध्येय (Sustainable Development Goals)**

संयुक्त राष्ट्रसंघाच्या सर्व (१९३) सदस्य राष्ट्रांनी दिनांक २५ सप्टेंबर, २०१५ रोजी झालेल्या ७० व्या सर्वसाधारण सभेत `शाश्वत विकास ध्येये २०३०' उपक्रम स्वीकारला आहे. सदर उपक्रमांतर्गत १७ शाश्वत विकास ध्येये व त्या अंतर्गत असलेली १६९ लक्ष्ये निर्धारित करण्यात आली आहेत. ही ध्येये साध्य करण्याचा कालावधी दिनांक ०१ जानेवारी, २०१६ ते ३१ डिसेंबर, २०३० असा ठरविण्यात आलेला आहे. या ध्येयांची मध्यवर्ती संकल्पना `कोणीही वंचित राहणार नाही' अशी आहे.

सदर संकल्पना साध्य करण्याच्या उद्देशाने असमानतेशी लढा, सर्वसमावेशक समाज निर्मिती, लिंग समानता, महिलांचे सक्षमीकरण या क्षेत्रांवर ही ध्येये लक्ष केंद्रित करतात. शाश्वत विकास ध्येये २०३०' उपक्रम साध्य करण्याकरिता धोरणे आखणे, अंमलबजावणी यंत्रणेत सुधारणा करणे यांकरिता शाश्वत विकास ध्येये व त्या अंतर्गत असलेल्या लक्ष्यांच्या अंमलबजावणीत १५ वर्षांच्या (सन २०१६ ते सन २०३०) कालावधीत होणाऱ्या प्रगतीच्या संदर्भात नियमित पाठपुरावा व पुनरावलोकन आवश्यक आहे. या अनुषंगाने जागतिक स्तरावर-जागतिक निर्देशक आराखडा, राष्ट्रीय स्तरावर-राष्ट्रीय निर्देशक आराखडा, राज्य स्तरावर-राज्य निर्देशक आराखडा तसेच जिल्हा स्तरावर-जिल्हा निर्देशक आराखडा तयार करण्यात आलेला आहे.

राज्यात १७ शाश्वत विकास ध्येये व त्या अंतर्गत १६९ लक्ष्ये साध्य करण्यासाठी `नोडल विभाग' म्हणून `नियोजन विभाग' कार्यरत आहे. नियोजन विभागाने राज्याचा शाश्वत, संतुलित व सर्वसमावेशक सामाजिक-आर्थिक विकास या मूलभूत तत्वावर आधारित शाश्वत विकास ध्येये व त्या अंतर्गत निर्धारीत केलेली लक्ष्ये विचारात घेऊन तयार केलेले `महाराष्ट्र व्हिजन २०३०' हे प्रकाशन सन २०१७ मध्ये नीति आयोगास सादर केले आहे. शाश्वत विकास ध्येयांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी नियोजन विभागाच्या अधिनस्त अर्थ व सांख्यिकी संचालनालयांतर्गत **`शाश्वत विकास ध्येय-अंमलबजावणी व समन्वय केंद्र'** स्थापन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शाश्वत विकास ध्येय-राज्य निर्देशक आराखडा प्रगतीमापन अहवाल सन २०२२-२३ पर्यंत प्रकाशित करण्यात आलेला असून प्रगतीमापन अहवाल सन २०२३-२४ व सन २०२४-२५ चे काम प्रगतीपथावर आहे. शाश्वत विकास ध्येय-जिल्हा निर्देशक आराखडा-प्रगतीमापन अहवाल सन २०१५-१६ ते सन २०२२-२३ सर्व जिल्ह्यांनी प्रकाशित केला असून त्यावर आधारित SDG Maharashtra Index तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

शाश्वत विकास ध्येयांशी संबंधित सर्व अद्ययावत माहिती उपलब्ध करून देणाऱ्या `महाराष्ट्र शाश्वत विकास ध्येय-डॅशबोर्ड' च्या विकसनाचे काम अंतिम टप्प्यात आहे. सदर डॅशबोर्डवर राज्य निर्देशक आराखडा व जिल्हा निर्देशक आराखडा संबंधित निर्देशकांची माहिती ऑनलाईन आज्ञावलीमध्ये २०१५-१६ पासूनची उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. सदरील डॅशबोर्डवर शाश्वत विकास ध्येयासंबंधित प्रकाशित करण्यात आलेली सर्व प्रकाशने उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत.

शासनाच्या नवनवीन अंमलात येणाऱ्या योजना, शासकीय धोरणांमध्ये होणारे बदल, माहिती संकलनामध्ये येणाऱ्या अडचणी, तसेच कालानुरूप काही निर्देशक वगळून सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय यांनी राष्ट्रीय स्तरावर राष्ट्रीय निर्देशक आराखड्यामध्ये केलेल्या बदलांच्या अनुषंगाने राज्य निर्देशक आराखडा २.० तसेच जिल्हा निर्देशक आराखडा २.० आणि दोन्हींचा मेटाडेटा यांची सुधारित आवृत्ती तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. या अनुषंगाने प्रशासकीय विभागांची दि. ११.११.२०२५, दि. १२.११.२०२५ व दि. १३.११.२०२५ रोजी कार्यशाळा घेण्यात आली.

**११. विकसित महाराष्ट्र - २०४७ :**

भारत सरकारकडून स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त भारताला सन २०४७ पर्यंत "विकसित भारत-भारत @२०४७" करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. त्यानुसार महाराष्ट्राने २०४७ पर्यंत "विकसित महाराष्ट्र-विकसित भारतासाठी" हे ध्येय निश्चित केले आहे. भारताच्या स्वातंत्र्याच्या शताब्दी वर्षी महाराष्ट्राला ५ ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था घडवायची आहे.

दिनांक ६ मे, २०२५ ते २ ऑक्टोबर, २०२५ पर्यंत १५० दिवसांच्या कार्यक्रमामध्ये विकसित महाराष्ट्र-२०४७ (Vision Document) चा समावेश करण्यात आला. विकसित महाराष्ट्र-२०४७ चे Vision Document तयार करण्याकरिता क्षेत्रनिहाय १६ क्षेत्रीय गट तयार करण्यात आले असून प्रत्येक गटासाठी संयोजकांची (Conveners) नियुक्ती करण्यात आली. Vision Document तयार करताना ते ३ टप्प्यात विभाजित करण्यात आले असून खालीलप्रमाणे अल्पकालीन, मध्यमकालीन व दीर्घकालीन टप्प्यांचा समावेश करण्यात आला आहे.

१) १५ ऑगस्ट २०४७ चे दीर्घकालीन व्हिजन (भारत @ १००)

२) ०१ मे २०३५ चे मध्यमकालीन व्हिजन (महाराष्ट्र @ ७५)

३) ०२ ऑक्टोबर २०२९ चे अल्पकालीन व्हिजन (वार्षिक लक्ष्यांसह)

**सर्वेक्षण अभियान व कार्यपद्धती -**

विकसित महाराष्ट्र-२०४७ - व्हिजन डॉक्युमेंटचा मसुदा तयार करण्यासाठी (१) कृषि (२) उद्योग (३) सेवा (४) पर्यटन (५) नगर विकास (६) ऊर्जा आणि शाश्वत विकास (७) पाणी (८) वाहतूक (९) शिक्षण आणि कौशल्य विकास (१०) आरोग्य (११) समाज कल्याण (१२) सॉफ्ट पॉवर (१३) शासन (१४) तंत्रज्ञान (१५) सुरक्षा व (१६) वित्त असे १६ क्षेत्रीय गट स्थापन करण्यात आले. प्रत्येक गटासाठी २ संयोजक नियुक्त करण्यात आले.

राज्यातील नागरिकांची विकसित महाराष्ट्र-२०४७ संदर्भातील मते, अपेक्षा, अभिप्राय, आकांक्षा व प्राथम्यक्रम जाणून घेण्यासाठी माहिती व जनसंपर्क विभागाच्या मदतीने राज्यव्यापी सर्वेक्षण अभियान राबविण्यात आले. या अंतर्गत ३.८ लाख नागरिकांनी प्रतिसाद दिला. तसेच विविध विभागनिहाय सर्वेक्षणाद्वारे ७ लाखांपेक्षा अधिक नागरिकांनी आपली मते मांडली आहेत.

दिनांक २८.१०.२०२५ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत विकसित महाराष्ट्र-२०४७ च्या व्हिजन डॉक्युमेंटला मान्यता देऊन अंमल-बजावणीसाठी व्हिजन मॅनेजमेंट युनिट स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**विकसित महाराष्ट्र-२०४७ व्हिजन डॉक्युमेंटचा सारांश :-**

**प्रमुख स्तंभ**

मंत्रालयीन विभागांचे १६ क्षेत्रीय गट तयार करण्यात आले. सदर १६ क्षेत्रीय गट प्रगतीशील, शाश्वत, सर्वसमावेशक व सुशासन या ४ स्तंभामध्ये विभाजित करुन खालीलप्रमाणे व्हिजन निश्चित करण्यात आले आहे.

**अ. प्रगतीशील** (Growth Driven) :

(१) **कृषि :** हवामान बदलाच्या लवचिकतेसह शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे आणि ग्रामीण-शहरी जीवनमानात समानता साध्य करणे.

(२) **सेवा :** नव्या कालखंडात संपूर्ण जगात वित्त, आघाडीचे तंत्रज्ञान, माध्यमे आणि मनोरंजन यामध्ये आघाडीवर रहाणे.

(३) **उद्योग :** सर्व जगासाठी महाराष्ट्रात निर्मिती आणि रचना करणे, ज्यायोगे राज्याच्या एकूण स्थूल उत्पन्नापैकी एक तृतीयांशपेक्षा जास्त उत्पन्न उद्योग क्षेत्रातून येईल.

(४) **पर्यटन :** जबाबदार, सुरक्षित आणि कचरामुक्त पर्यटनाद्वारे सरासरी पर्यटकांचा मुक्काम आणि व्यय वाढविणे.

**ब. शाश्वत** (Sustainable) :

(१) **नागरी/शहरी :** शहरांत झोपडपट्टी-मुक्त, स्वच्छ, परवडणाऱ्या घरांसह आपत्ती-प्रतिरोधक, पूर्ण रोजगारयुक्त, सोप्या सार्वजनिक वाहतुकीची उपलब्धता आणि वाहतुकीचे जाळे असणारी रचना उभारणे.

(२) **पाणी :** संवर्धन आणि पुनर्वापराद्वारे सर्वांना पिण्यायोग्य पाणी उपलब्ध करुन देणे.

(३) **ऊर्जा आणि शाश्वतता :** राज्याच्या एक तृतीयांश पेक्षा जास्त भूभाग हरित आच्छादनाखाली आणून जागतिक स्तरावर स्पर्धात्मक किंमतीत विश्वासार्ह, हरित आणि स्वच्छ उर्जा उपलब्ध करून देणे.

(४) **वाहतूक आणि लॉजिस्टिक्स :** प्रवासी आणि माल-वाहतुकीसाठी विश्वसनीय, सुरक्षित आणि अखंड मल्टीमोडल (बहु-पद्धती) कनेक्टिव्हिटी सुनिश्चित करणे.

**क. सर्वसमावेशक** (Inclusive) :

(१) **शिक्षण आणि कौशल्य विकास :** शिक्षण, नावीन्यपूर्णता आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देणारे असे सर्वसमावेशक, उद्योगांशी संबंधित शिक्षण आणि कौशल्य देणारे जागतिक दर्जाचे प्रतिभा केंद्र तयार करणे.

(२) **समाज कल्याण :** सामाजिक-आर्थिक समता आणि वंचित सामाजिक गटांसाठी समान संधी सुनिश्चित करणे.

(३) **आरोग्य :** परवडणाऱ्या आणि दर्जेदार आरोग्यसेवेची सार्वत्रिक उपलब्धता सुनिश्चित करणे आणि अकाली मृत्यूदर एक तृतीयांशाने कमी करणे.

**(४) सॉफ्ट पॉवर :** वारसा, संस्कृती, चित्रपट, भाषा आणि क्रीडा यांना जागतिक मान्यता मिळवणे.

**ड. सुशासन** (Good Governance) :

(१) **प्रशासन :** किमान शासन आणि कमाल प्रशासन सुनिश्चित करणे.

(२) **सुरक्षा :** राज्यातील प्रत्येक नागरीकासाठी सुरक्षा, सुरक्षितता आणि आपत्ती प्रतिरोधकता सुनिश्चित करणे.

(३) **तंत्रज्ञान :** प्रभावी प्रशासनासाठी तंत्रज्ञानाचा वापर करणे.

(४) **वित्त :** विवेकी वित्तीय व्यवस्थापन आणि पर्यायी वित्तपुरवठा मॉडेलद्वारे शाश्वत वित्तीय मार्ग सुनिश्चित करणे.

**स्वातंत्र्याच्या १०० वर्षासाठी १०० उपक्रम :**

विकसित महाराष्ट्र-२०४७ अंतर्गत भारताच्या स्वातंत्र्याला १०० वर्षे पूर्ण होताना राज्याचे १०० उपक्रम, १५० पेक्षा जास्त मापदंड (Metrics) व ५०० पेक्षा जास्त टप्पे निश्चित केले आहेत.

**अंमलबजावणी व्यवस्था :**

विकसित महाराष्ट्र-२०४७ च्या अंमलबजावणीसाठी माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली व्हिजन मॅनेजमेंट नियामक मंडळ, मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली व्हिजन डॉक्युमेंट आढावा समिती व प्रधान सचिव, नियोजन यांच्या अध्यक्षतेखाली विकसित महाराष्ट्र व्हिजन मॅनेजमेंट युनिट (व्हीएमयू) गठीत करण्यात आले आहे.

**व्हिजन मॅनेजमेंट युनिटचे कार्यक्षेत्र खालीलप्रमाणे आहे--**

* सर्व गुंतवणूक/धोरण, व्हिजनच्या ध्येयाशी सुसंगत असेल याची खात्री करण्यात येईल.
* प्रगती आणि मेट्रिक्सचा तिमाही आढावा घेण्यात येईल.
* विभागांशी समन्वय साधून त्यांच्या अडचणी दूर करण्यात येतील.

## (ब) विभागाचे अतिरिक्त कार्यक्रम

### १) तीर्थक्षेत्र व पर्यटन स्थळ विकास आराखडा

**१. शेगांव विकास कार्यक्रम-**

श्री संत गजानन महाराज समाधी जन्मशताब्दी निमित्त शेगांव येथील भाविकांसाठी मूलभूत सुविधा निर्माण करण्यासाठी रु. ५३९.९६ कोटींचा सुधारित विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. त्यामध्ये शासनाचा सहभाग रु. ४२९.५६ कोटीचा आहे. सन २०२५-२६ साठी रु. ०.६२ कोटी निधीची तरतूद करण्यात आली असून सन २०२६-२७ करिता रु. २१.४२५० कोटी इतकी अर्थसंकल्पिय तरतूद प्रस्तावित आहे.

**२. लोणार सरोवर विकास आराखडा-**

मा. उच्च न्यायालयाच्या दि. १५.०६.२०२२ रोजीच्या आदेशास अनुसरुन महसूल व वन विभागाच्या दि. २७-०७-२०२२ रोजीच्या आदेशान्वये लोणार सरोवराचे संरक्षण, संवर्धन व जतन करण्यासाठी विविध विभागाच्या माध्यमातून करावयाच्या कामाच्या अंदाजित रु. ४३४.६२ कोटी रकमेच्या लोणार सरोवर विकास आराखड्यास मान्यता देण्यात आली आहे. लोणार सरोवर विकास आराखड्या अंतर्गत समाविष्ट मंजूर कामे विहित कालावधीत पूर्ण करण्याकरिता विविध विभागांतर्गत कामे सोपविण्यात आलेली आहेत. सन २०२५-२६ साठी रु. ९१.५३ कोटी निधीची तरतूद करण्यात आली असून नियोजन विभागाकडे दर्शविण्यात आलेली कामे पूर्ण करण्याकरिता आर्थिक वर्ष सन २०२६-२७ करिता रु. ८०.०० कोटी इतकी अर्थसंकल्पिय तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

**३. मोझरी विकास आराखडा-**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जन्मशताब्दी निमित्त श्रीक्षेत्र मोझरी, जिल्हा अमरावती येथील संत तुकडोजी महाराज जन्मस्थळी नागरी मूलभूत सुविधा निर्माण करण्यासाठी रु. १५०.८३ कोटीचा सुधारित विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. सन २०२५-२६ साठी रु. २.२१ कोटी निधीची तरतूद करण्यात आली असून सन २०२६-२७ करिता रु. २.१४ कोटी इतकी अर्थसंकल्पिय तरतूद प्रस्तावित आहे.

**४. वलगांव ता. व जिल्हा अमरावती येथे संत गाडगेबाबा निर्वाणभूमी विकास आराखडा :-**

वलगांव ता. व जिल्हा अमरावती येथे संत गाडगेबाबा निर्वाणभूमी विकासासाठी रु. ३७.८७ कोटीचा विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. सन २०२५-२६ साठी रु. २.४५ कोटी निधीची तरतूद करण्यात आली असून सन २०२६-२७ करिता रु. २.२५ कोटी इतकी अर्थसंकल्पिय तरतूद प्रस्तावित आहे.

**५. कौंडण्यपूर विकास आराखडा :-**

श्रीक्षेत्र कौंडण्यपूर, ता. तिवसा, जि. अमरावती येथे नागरी पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी रु. २०.०० कोटीचा सुधारीत विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. सन २०२५-२६ साठी रु. ०.७७६२ कोटी निधीची तरतूद करण्यात आली असून सन २०२६-२७ करिता रु. १.२८ कोटी इतकी अर्थसंकल्पिय तरतूद प्रस्तावित आहे.

**६. श्री क्षेत्र गणपतीपुळे तिर्थक्षेत्र विकास आराखडा, ता. जि. रत्नागिरी**

श्री क्षेत्र गणपतीपुळे तिर्थक्षेत्र, तालुका-जिल्हा रत्नागिरीच्या विकासाकरिता रु. १०२.२९ कोटीचा विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. सन २०२५-२६ साठी रु. १९.२३४ कोटी निधीची तरतूद करण्यात आली असून सन २०२६-२७ करिता रु. १०.०० कोटी इतकी अर्थसंकल्पिय तरतूद प्रस्तावित आहे.

**७. श्री क्षेत्र देहू, आळंदी, भंडारा डोंगर, पंढरपूर व पालखीतळ/ मार्ग विकास आराखडा-**

संतश्रेष्ठ तुकाराम महाराज जन्म चतु:शताब्दी निमित्त श्री क्षेत्र देहू, आळंदी, भंडारा डोंगर, पंढरपूर व पालखीतळ विकासाचा रु. १४२७.८५ कोटीचा सुधारित विकासाचा आराखडा तयार करण्यात आला आहे. त्यामध्ये शासनाचा सहभाग रु. १३०४.०० कोटी आहे. सन २०२५-२६ साठी रु. ५७.३५ कोटी निधीची तरतूद करण्यात आली असून सन २०२६-२७ करिता रु. २१.७९ कोटी इतकी अर्थसंकल्पिय तरतूद प्रस्तावित आहे.

**८. श्रीक्षेत्र घृष्णेश्वर, वेरुळ, तालुका खुलताबाद, जि. छत्रपती संभाजीनगर विकास आराखडा-**

श्रीक्षेत्र घृष्णेश्वर, वेरुळ, तालुका खुलताबाद, जि. छत्रपती संभाजीनगर हे भारतातील १२ ज्योतिर्लिंगापैकी एक महत्त्वाचे ज्योतिर्लिंग आहे. या तीर्थक्षेत्रास भेट देणाऱ्या पर्यटक व भाविकांना सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने रु. १५६.६३ कोटीचा विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. सन २०२५-२६ मध्ये रु. ३०.०० कोटी निधीची तरतूद करण्यात आली असून सन २०२६-२७ या वित्तीय वर्षासाठी रु. ३०.०० कोटी इतकी अर्थसंकल्पिय तरतूद प्रस्तावित आहे.

**९. श्री क्षेत्र भिमाशंकर तिर्थक्षेत्र विकास आराखडा, जिल्हा पुणे**

श्री क्षेत्र भिमाशंकर, पुणे हे बारा ज्योतिर्लिंगापैकी महत्त्वाचे सहावे ज्योतिर्लिंग आहे. येथे येणाऱ्या पर्यटक व भाविकांना सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने रु. १४८.३७ कोटीचा विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. या आराखड्यासाठी सन २०२५-२६ या वित्तिय वर्षासाठी रु. १२.०० कोटी इतका निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे. सन २०२६-२७ या वित्तीय वर्षासाठी रु. १५.०० कोटी इतकी अर्थसंकल्पिय तरतूद प्रस्तावित आहे.

**१०. ताजबाग, जि. नागपूर विकास आराखडा :**

नागपूर शहरात असलेला हजरत बाबा ताजुद्दीन यांचा ताजबाग येथील दर्गा देश विदेशातील भाविकांचे श्रद्धास्थान आहे. या परिसराचा विकास व सौंदर्यीकरण करण्यासाठी रु. १३२.४९ कोटीचा आराखडा तयार करण्यात आला आहे. सन २०२५-२६ या वित्तीय वर्षासाठी रु. २.४९ कोटी तरतूद करण्यात आली आहे. सन २०२६-२७ या वित्तीय वर्षासाठी रु. १.०० कोटी इतकी अर्थसंकल्पिय तरतूद प्रस्तावित आहे.

**११. श्री क्षेत्र जेजुरी गड तिर्थक्षेत्र विकास आराखडा**

जेजुरी हे महाराष्ट्रातील प्रमुख धार्मिक स्थळांपैकी एक देवस्थान आहे. खंडेरायाची जेजुरी म्हणून ओळखल्या जाणा-या पुणे जिल्ह्यातील जेजुरी येथे वर्षभरात विविध सण, उत्सवांकरिता २५ ते ४० लाख भाविक राज्यभरातून व परराज्यातून भेट देतात. त्यामुळे रु. १२५.६३ कोटी किमतीच्या श्री क्षेत्र जेजुरी गड तिर्थक्षेत्र सुधारित विकास आराखड्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सन २०२५-२६ या वित्तीय वर्षासाठी रु. ५०.०० कोटी तरतूद करण्यात आली आहे. सन २०२६-२७ करिता रु. ३०.०० कोटी इतकी अर्थसंकल्पिय तरतूद प्रस्तावित आहे.

**१२. सेवाग्राम, जि. वर्धा विकास आराखडा-**

वर्धा येथील महात्मा गांधी यांच्या सेवाग्राम आश्रमास ७५ वर्षे पूर्ण झाली असून आश्रमाचे ऐतिहासिक महत्त्व विचारात घेऊन तेथे देश-विदेशातून येणाऱ्या विद्यार्थी व पर्यटक यांच्यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचे केंद्र व पायाभूत सेवा सुविधाकरिता रु. २४४.०८४५ कोटीचा विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. यासाठी सन २०२५-२६ या वित्तीय वर्षात रु. ५७.७३ कोटी निधीची तरतूद करण्यात आली असून सन २०२६-२७ या वित्तीय वर्षासाठी रु. ३०.०० कोटी इतकी अर्थसंकल्पिय तरतूद प्रस्तावित आहे.

**१३. स्वराज्यरक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे बलिदान स्थळ मौजे तुळापूर व समाधी स्थळ स्मारक वढु (बु.) विकास आराखडा :**

महाराष्ट्रातील स्वराज्यरक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या हौतात्म्याचा आदर व कृतज्ञता व्यक्त करण्याकरिता स्वराज्यरक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे जागतिक दर्जाचे प्रेरणादायी स्मारक उभारण्यासाठी त्यांचे बलिदान स्थळ मौजे तुळापूर व समाधी स्थळ स्मारक वढु (बु.) या स्थळांचा रु. २८२.२४२५ कोटीचा सुधारीत विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. यासाठी सन २०२५-२६ या वित्तीय वर्षात रु. ७५.०० कोटी निधीची तरतूद करण्यात आली असून सन २०२६-२७ या वित्तीय वर्षासाठी रु. २५.०० कोटी इतकी अर्थसंकल्पिय तरतूद प्रस्तावित आहे.

**१४. पाथरी तिर्थक्षेत्र विकास आराखडा-**

पाथरी तिर्थक्षेत्र, जिल्हा परभणी येथे श्री साईबाबा जन्मस्थानाचा विकास करण्यासाठी रुपये ९१.८०९४ कोटीचा आराखडा तयार करण्यात आला आहे. सन २०२६-२७ या वर्षामध्ये पायाभूत सुविधा विषयक कामे प्रस्तावित आहेत.

**१५. श्री औंढा नागनाथ (हिंगोली) तिर्थक्षेत्र विकास आराखडा-**

श्री औंढा नागनाथ तीर्थक्षेत्र, हिंगोली हे बारा ज्योतिर्लिंगापैकी महत्त्वाचे आठवे ज्योतिर्लिंग आहे. श्रावणी सोमवार, आषाढी एकादशी, कार्तिकी एकादशी, महाशिवरात्र या वेळेस मोठ्या प्रमाणावर भाविक नागनाथाच्या दर्शनासाठी येतात. श्री औंढा नागनाथ (हिंगोली) तिर्थक्षेत्र विकास आराखड्यास एकूण रु. १५.२१ कोटी किंमतीची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

**१६. श्री क्षेत्र सप्तश्रृंगी देवी, सप्तश्रृंगी गड, ता. कळवण विकास आराखडा :**

हे तिर्थक्षेत्र साडेतीन शक्तीपीठापैकी अर्धपीठ आहे. त्याठिकाणी यात्रेकरिता साधारणत: २५ ते ३० लाख भाविक व पर्यटक येत असून सदर तीर्थक्षेत्रास ब वर्ग दर्जा प्रदान करण्यात आलेला आहे. सदर क्षेत्राचे महत्त्व लक्षात घेता या ठिकाणी पर्यटक व भाविकांसाठी मूलभूत व पायाभूत सुविधा पुरविणे अत्यंत आवश्यक असल्याने श्री क्षेत्र सप्तश्रृंगी देवी, सप्तश्रृंगी गड, ता. कळवण या स्थळाचा रु. ८१.८६ कोटी किमतीचा विकास आराखडा तयार करण्यात आला आहे.

**१७. हुतात्मा शिवराम हरी राजगुरु जन्मस्थळ परिसर विकास आराखडा-**

पुणे जिल्ह्यातील राजगुरुनगर येथील हुतात्मा श्री शिवराम हरी राजगुरु जन्मस्थळ परिसर विकासासाठी शासनाने पहिल्या टप्प्यात रु. १०२.४८ कोटीच्या आराखड्यास मान्यता दिलेली असून राजगुरुनगर येथील हुतात्मा शिवराम हरी राजगुरु यांच्या जन्मस्थान व वाडा परिसराच्या विकासकामांचा आराखड्यात समावेश आहे.

**१८. मालोजीराजे भोसले यांच्या गढीचे व हजरत चाँदशहवली बाबा दरगाह विकास आराखडा-**

पुणे जिल्ह्यातील इंदापूर शहरातील मालोजीराजे भोसले यांच्या गढीचे व हजरत चांदशाहवली बाबा दरगाहा परिसर विकास आराखड्यातील रु. ३७.२८ कोटीच्या कामांना शासनाने मान्यता प्रदान केलेली आहे. मराठा साम्राज्य शैलीच्या अनुषंगाने गढीची पुनर्स्थापना व संवर्धन करणे, इ. कामांचा समावेश आहे.

**१९. राजमाता सईबाई स्मृतीस्थळ विकास आराखडा-**

पुणे जिल्ह्यातील राजगडाच्या पायथ्याशी असलेल्या मौजे पाल खुर्द, ता वेल्हे येथील राजमाता सईबाई स्मृतीस्थळ विकास आराखड्यातील रु. ४६.३३ कोटीच्या कामांना शासनाने सुधारित मान्यता प्रदान केलेली आहे. स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी राजेंच्या मातोश्री महाराणी सईबाई यांच्या स्मृतीस्थान परिसरातील विकासकामांचा आराखड्यात समावेश आहे.

**२०. श्री क्षेत्र देहू, आळंदी, भंडारा डोंगर, पंढरपूर व पालखीतळ / मार्ग विकास आराखडा अंतर्गत मौजे सुदुंबरे, ता. मावळ, जि. पुणे येथील श्री संत जगनाडे महाराज यांच्या समाधीचा विकास व सौंदर्यीकरण करणे :**

या विकास आराखड्यातील रु.६६.११८ कोटीच्या कामांना शासनाने मान्यता प्रदान केलेली आहे. सभामंडप, प्रशासकीय इमारत बांधकाम, २१ फुटी कास्य पुतळा आणि दगडी आच्छादन असलेले संग्रहालय, भक्त निवास, ॲम्फिथिएटर, गार्डन, महाद्वार, घाट बांधकाम, संरक्षण भिंत, अंतर्गत रस्ते, मैदान, वाहनतळ, बाह्यवळण रस्त्याची सुधारणा, पाणी व्यवस्था, स्वच्छतागृह, CCTV, सोलर वॉटर सिस्टीम इ. कामांचा आराखड्यात समावेश केलेला आहे.

**२१. वढा, जि. चंद्रपूर येथील विठ्ठल रुक्मिणी मंदीर परिसरातील विकास आराखडा :**

चंद्रपूर येथील मौजे वढा येथे विठ्ठल रुक्मिणी मंदीर परिसराचा विकास करण्याची बाब प्रस्तावित होती. त्या अनुषंगाने रू.२५.०० कोटी किमतीच्या मौजे वढा, जि. चंद्रपूर येथील विठ्ठल रुक्मिणी मंदीर परिसरातील विकास आराखड्यास मान्यता देण्यात आली आहे.

**२२. पंढरपूर मंदीर विकास आराखडा-**

पंढरपूर ही महाराष्ट्राची धार्मिक व आध्यात्मिक राजधानी आहे. पंढरपूर येथे भाविक व मुख्यत: वारकरी संप्रदायाचे लोक मोठ्या प्रमाणावर श्री विठ्ठलाच्या दर्शनासाठी येतात. पंढरपूर येथे वर्षातून ४ मोठ्या यात्रा भरतात. त्यापैकी आषाढी व कार्तिकी एकादशीला सुमारे १३ ते १४ लाख भाविक येतात. भाविकांच्या मोठ्या प्रमाणावरील भेटीमुळे पंढरपूर येथील सध्या अस्तित्वात असलेल्या पायाभूत सोयी-सुविधांवर मोठ्या प्रमाणावर ताण पडतो. या सर्व बाबी विचारात घेऊन रु. ७३.८५९५ कोटीच्या पंढरपूर मंदीर विकास आराखड्यास मान्यता देण्यात आली आहे.

**२३. शिराळा, ता.शिराळा, जि.सांगली येथील छत्रपती संभाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेले स्मृतीस्थळ विकास आराखडा :**

सांगली जिल्ह्यातील शिराळा हे शहर ऐतिहासिक वारसा असणारे शहर असून येथे भुईकोट किल्ल्यावर छत्रपती संभाजी महाराज कैदेत असल्यामुळे सदर स्थळाला ऐतिहासिक महत्त्व आहे. शिराळा, ता. शिराळा, जि. सांगली येथील छत्रपती संभाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या सदर स्मृतीस्थळाच्या विकास आराखड्यास रु. १३.४६ कोटी किंमतीची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

**२४. सातारा जिल्ह्यातील पश्चिम घाट परिसरातील धार्मिक, ऐतिहासिक व निसर्ग पर्यटनस्थळे विकासाचा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा अंतर्गत श्री क्षेत्र महाबळेश्वर प्रतापगड किल्ला जतन व संवर्धन, सहयाद्री व्याघ्र राखीव वनक्षेत्रातील पर्यटन विकास व कोयना हेळवाक वन झोन अंतर्गत कोयना नदी जलपर्यटन आराखडा :**

सातारा जिल्हा हा वैविध्यपूर्ण नैसर्गिक साधनसंपत्तीचे वरदान आणि ऐतिहासिक महत्त्व लाभलेला जिल्हा आहे. या जिल्ह्यात जागतिक दर्जाचे पर्यटन क्षेत्र निर्माण करण्यासाठी, स्थानिक अर्थव्यवस्था वृद्धिंगत होण्यासाठी आणि स्थानिकांना रोजगार निर्माण करण्यासाठी एकात्मिक पर्यटन सर्किट विकसित करण्याचे प्रस्तावित होते. त्या अनुषंगाने पर्यटकांना एकाच जिल्ह्यात धार्मिक, ऐतिहासिक आणि नैसर्गिक पर्यटनाचा अनुभव देण्यासाठी सातारा जिल्ह्यातील पश्चिम घाट परिसरातील धार्मिक, ऐतिहासिक व निसर्ग पर्यटनस्थळे विकासाच्या एकात्मिक पर्यटनाच्या रु. ४२७.४१६ कोटी किमतीच्या सुधारित विकास आराखडयास मान्यता देण्यात आली आहे. या प्रकल्पांतर्गत (१) सह्याद्री व्याघ्र राखीव वनक्षेत्रातील पर्यटन विकास आराखडा, (२) कोयना हेळवाक वन झोन अंतर्गत कोयना नदी जलपर्यटन आराखडा, (३) प्रतापगड किल्ला जतन आणि संवर्धन व (४) श्री क्षेत्र महाबळेश्वर पर्यटन विकास आराखडा या घटकांचा समावेश करण्यात आला आहे.

**२५. कुरवंडे, ता. मावळ, जि. पुणे येथील टायगर व लायन्स पॉइंट विकसित करण्याचा आराखडा**

लोणावळा येथील पर्यटनाला चालना देण्यासाठी कुरवंडे (लोणावळ्याजवळ) ता. मावळ येथील टायगर व लायन्स पॉईट या लोकप्रिय पर्यटनस्थळांना पर्यटकांचा मिळणारा मोठा प्रतिसाद विचारात घेऊन पर्यटकांसाठी सदर ठिकाणी पायाभूत सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने विविध विकास कामे करणे आवश्यक आहे. सदर विकास आराखड्यात टायगर व लायन्स पॉईंट परिसर विकास, ग्लास स्कायवॉक, लायन्स व टायगर पॉईंट जोडणारा दरीवरील पूल, साहसी खेळांचा विकास, व आवश्यक पायाभूत सुविधांचा विकास करण्याबाबतची कामे प्रस्तावित असून या कामांसाठी एकूण रु. ३३३.५६ कोटीच्या आराखड्यास मान्यता देण्यात आली आहे.

**२६. सोलापूर जिल्ह्यातील उजनी जलाशय, जलपर्यटन, धार्मिक, निसर्ग पर्यटन, कृषी पर्यटन, विनयार्ड पर्यटन विकासाचा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा :**

सोलापूर जिल्हा धार्मिक पर्यटनासाठी प्रसिद्ध आहे. येथे पंढरपूर, अक्कलकोट व बार्शी येथे विविध प्रसिद्ध धार्मिक स्थळे आहेत. त्याप्रमाणेच या जिल्ह्यात जागतिक दर्जाचे पर्यटन क्षेत्र निर्माण करण्यासाठी, स्थानिक अर्थव्यवस्था वृद्धिंगत होण्यासाठी आणि स्थानिकांना रोजगार निर्माण करण्यासाठी उजनी जलाशय जलपर्यटन हा केंद्रबिंदू धरून एकात्मिक पर्यटन सर्किट विकसित करण्याचे प्रस्तावित होते. त्या अनुषंगाने पर्यटकांना एकाच जिल्ह्यात धार्मिक पर्यटन, जलपर्यटन, कृषी पर्यटन आणि विनयार्ड याचा अनुभव देण्यासाठी रु. २८२.७५ कोटी किमतीच्या आराखड्यास मान्यता देण्यात आली आहे.

**२७. अष्टविनायक गणपती मंदिरांचा जीर्णोद्धार करण्याचा विकास आराखडा-**

महाराष्ट्रातील सर्वसामान्य भाविक आणि गणेशभक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या आणि महाराष्ट्रातील अष्टविनायक म्हणून प्रसिद्ध असलेल्या स्थळांपैकी मोरगाव, थेऊर, रांजणगाव, ओझर व लेण्याद्री (सर्व जिल्हा पुणे), पाली, महाड (जिल्हा रायगड) आणि सिद्धटेक (जिल्हा अहिल्यानगर) या आठ तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी भाविकांची आणि पर्यटकांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ वाढत असल्याने, सदर ठिकाणी मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करणे आवश्यक आहे. सबब रु. १४७.८१ कोटी किमतीच्या अष्टविनायक गणपती मंदिरांचा जीर्णोद्धार करण्याच्या विकास आराखड्यास मान्यता देण्यात आली आहे.

**२८. श्री क्षेत्र तुळजाभवानी देवी मंदिर विकास आराखडा**

तुळजापूरला जागतिक दर्जाचे धार्मिक व सांस्कृतिक पर्यटनस्थळ बनवण्यासाठी, स्थानिक नागरीक व भाविकांचा त्रास कमी करुन पायाभूत सुविधांवरचा ताण कमी करणे आणि शाश्वत उपाययोजना तयार करणे, हे विकास आराखडयाचे मुख्य उद्दिष्ट आहे. सबब,

श्री क्षेत्र तुळजाभवानी देवी मंदीराच्या प्रस्तावित रु. १८६५.०० कोटी किंमतीच्या विकास आराखड्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

**२९. श्री क्षेत्र जोतिबा मंदिर विकास आराखडा**

श्री क्षेत्र जोतिबा मंदीराच्या प्रस्तावित रुपये २५९.५९ कोटी किमतीच्या कामांच्या विकास आराखड्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

**३०. मौजे चौंडी, ता. जामखेड, जि. अहिल्यानगर येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृती स्थळांचे जतन व संवर्धन विकास आराखडा :**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर मौजे चौंडी, ता. जामखेड, जि. अहिल्यानगर येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृती स्थळांचे जतन व संवर्धनाच्या प्रस्तावित रुपये ६८१.३२ कोटी किमतीच्या विकास आराखड्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

**३१. श्री त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक तीर्थक्षेत्र विकास आराखडा :**

श्री त्र्यंबकेश्वर हे १२ ज्योर्तिलिंगापैकी एक जागृत देवस्थान असून दक्षिण भारतातील अत्यंत पवित्र स्थळांपैकी एक आहे. दर बारा वर्षांनी येणारा सिंहस्थ कुंभमेळा, माघ महिना गंगा गोदावरी उत्सव, माघ महिन्यातील महाशिवरात्री उत्सव, श्रीसंत श्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज यात्रा, श्रावण महिना प्रदक्षिणा यांसारख्या अनेक धार्मिक कार्यक्रमांमुळे येथे भाविक मोठ्या प्रमाणावर येतात. सन २०२६-२७ या काळात त्र्यंबकेश्वर येथे कुंभमेळा होणार असून कुंभमेळ्यात कोट्यवधी भाविक सहभागी होणार आहेत. सबब, श्री त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक या तीर्थक्षेत्राच्या रुपये २७५.०० कोटी किंमतीच्या विकास आराखड्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

**३२. कोल्हापूर शहर येथील श्री करवीर निवासिनी महालक्ष्मी अंबाबाई देवस्थान परिसर विकास आराखडा :**

कोल्हापूर शहर येथील श्री करवीर निवासिनी महालक्ष्मी अंबाबाई देवस्थान परिसर विकास आराखड्यास रुपये १४३.९० कोटीची सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

**३३. श्री क्षेत्र भीमाशंकर विकास आराखडा (कुंभमेळा २०२७- गर्दी व्यवस्थापन व इतर सोयी सुविधा)**

सन २०२७ मध्ये नाशिक येथे सिंहस्थ कुंभमेळा होणार आहे. सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी येणाऱ्या व भीमाशंकर तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या प्रचंड संख्येचा विचार करता, प्रस्तावित करण्यात आलेल्या पायाभूत सुविधा अपुऱ्या पडतील अशी शक्यता आहे. या अनुषंगाने या ठिकाणी होणाऱ्या संभाव्य गर्दीचे प्रभावी व्यवस्थापन व भाविकांना आवश्यक सोयी सुविधा पुरविण्यासाठी अस्तित्वात असलेल्या भीमाशंकर विकास आराखड्यातील कामांची द्विरुक्ती टाळून रुपये २८८.१७ कोटी किंमतीच्या **गर्दी व्यवस्थापन व पायाभूत सुविधांच्या स्वतंत्र विकास आराखड्यास** मान्यता देण्यात आली आहे.

* **टीप :-** तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रम याखालील अ. क्र. १४ ते ३३ करिता सन २०२५-२६ या वित्तीय वर्षासाठी सामायिकरित्या रु. ५४१.१८ कोटी तरतूद करण्यात आलेली आहे. सन २०२६-२७ या वित्तीय वर्षासाठी सामायिकरित्या रु. ५००.०० कोटी इतकी तरतूद प्रस्तावित आहे.

**२ मानव विकास कार्यक्रम**

शासनाने सन २०११-१२ पासून "मानव विकास" ही संकल्पना जिल्ह्याऐवजी ' तालुका ' हा महत्त्वाचा घटक मानून राबविण्याचा निर्णय घेतला आहे. त्या अनुषंगाने ' मानव विकास कार्यक्रम ' अंतर्गत सन २००१ च्या जनगणनेनुसार तालुक्यातील "स्त्री साक्षरतेचे प्रमाण" व सन २००२ च्या सर्वेक्षणानुसार "ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाचे प्रमाण" या दोन निर्देशांकाच्या आधारे राज्यातील २३ जिल्ह्यातील १२५ अति मागास तालुक्यांची निवड करण्यात आली आहे. या कार्यक्रमांतर्गत सन २०११-१२ पासून दरडोई उत्पन्न वाढविणे, आरोग्यविषयक सुविधा पुरविणे, दारिद्र्य निर्मूलन, शिक्षण इ. विषयीच्या नियमित योजना व जिल्हा-तालुका स्पेसिफिक योजना या १२५ तालुक्यांत राबविण्यात येत आहेत. मानव विकास कार्यक्रमाची व्याप्ती वाढविण्याच्या दृष्टीने सन २०१२-१३ या वर्षापासून हा कार्यक्रम निवडलेल्या १२५ तालुक्यातील ४३ "क" वर्ग नगरपालिकांमध्ये राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सन २०२५-२६ या वर्षासाठी सर्वसाधारण योजनेतून रु. १२४३.७३ कोटी तर अनुसूचित जाती उपयोजनेंतर्गत रु. २.०० कोटी अशा प्रकारे एकूण रु. १२४५.७३ कोटीचा नियतव्यय अर्थसंकल्पित करण्यात आला आहे.

मानव विकास कार्यक्रमाची मुदत दि. ३१.०३.२०२६ रोजी संपत असल्याने, माहे एप्रिल २०२६ ते जून २०२६ पर्यंतच्या कालावधीत आयुक्तालय व जिल्हा मानव विकास समिती कार्यालयाचे प्रचालन करण्याकरिता आस्थापनाविषयक खर्चाकरिता रु. ०.९९७५ कोटी व संभाव्य दायित्वासाठी नाममात्र रु. ०.००२५ कोटी अशी एकूण रु. १.०० कोटी इतकी अर्थसंकल्पिय तरतूद सर्वसाधारण योजनेकरिता प्रस्तावित आहे.

**३. खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम :-**

"खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम या केंद्र पुरस्कृत कार्यक्रमांतर्गत मा. संसद सदस्यांना त्यांच्या मतदार संघातील विकास कामे करण्यासाठी केंद्र शासनाकडून सन १९९३-९४ मध्ये प्रत्येकी रु. ५.०० लक्ष व १९९४-९५ ते १९९७-९८ पर्यंत रु. ०१.०० कोटी या प्रमाणात निधी दिला जात होता तसेच सन १९९८-९९ पासून सन २०१०-११ या आर्थिक वर्षापर्यंत रु. ०२.०० कोटी इतका निधी दिला जात होता. सन २०११-१२ या आर्थिक वर्षापासून संसद

सदस्यांना अनुज्ञेय असलेल्या निधीमध्ये वाढ करण्यात येऊन प्रत्येक संसद सदस्यांस प्रति आर्थिक वर्षाकरिता रु. ०५.०० कोटी इतका निधी देण्यात येत आहे.

या कार्यक्रमाची अंमलबजावणी व संनियंत्रण केंद्र शासनाच्या स्तरावर सांख्यिकी व कार्यक्रम कार्यान्वयन मंत्रालय, नवी दिल्ली यांच्यामार्फ़त करण्यात येत असून केंद्र शासनाने निश्चित केलेली मार्गदर्शक तत्वे विचारात घेऊन जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती यांच्यामार्फ़त राबविला जाते. दि. ०१ एप्रिल, २०२३ पासून या कार्यक्रमाची सुधारित मार्गदर्शक तत्वे लागू करण्यात आली असून या मार्गदर्शक सूचनांमधील तरतुदीनुसार नवीन सुधारित निधी वितरण प्रणालीचा (New Fund Flow System) नवीन MPLADS (e-SAKSHI Portal) चा अवलंब करण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत् अनुज्ञेय निधी विहित अटी/शर्तीची पूर्तता करून केंद्र शासनाने विकसित केलेल्या e-SAKSHI Portal वरून थेट Vendor /कंत्राटदार यांच्या खात्यावर जमा होतो. राज्य स्तरावर या कार्यक्रमाच्या अंमलबजावणी व संनियंत्रणाची जबाबदारी राज्य नोडल विभाग म्हणून नियोजन विभागाची आहे.

### ४. आमदार स्थानिक विकास कार्यक्रम :-

आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यांच्या गरजांवर आधारित लोकोपयोगी लहान स्वरुपाची कामे घेण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यासाठी विशेष तरतूद सन १९८३-८४ पासून करण्यात येत होती. सन १९८८-८९ पासून ही तरतूद विधानसभा मतदारसंघनिहाय करण्यात आली. सदर विशेष तरतूद सन १९९४-९५ पर्यंत नियमित योजना नियतव्ययाच्या व्यतिरिक्त होती. सन १९९४-९५ या आर्थिक वर्षामध्ये प्रथमच विधानपरिषद सदस्यांसाठीही तरतूद करण्यात आली. सन १९९५-९६ पासून हा कार्यक्रम जिल्हा नियोजन समित्यांच्या अखत्यारीत आणला होता व त्यासाठीची तरतूद जिल्हा योजनेसाठी उपलब्ध असलेल्या निधीतून करण्यात आली. तथापि, सन १९९९-२००० पासून या योजनेचा समावेश राज्यस्तर योजना म्हणून करण्यात आला. तसेच सन २००४-०५ या वर्षापासून आदिवासी मतदारसंघासाठीच्या निधीची तरतूद बिगर आदिवासी योजनेतून करण्यात येत असून सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या घटकांसाठी १०% निधी राखून ठेवण्याची तरतूद या कार्यक्रमांतर्गत करण्यात येते. सन २००६-०७ या वर्षापासून सर्व विधानपरिषद सदस्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील (कार्यक्षेत्र नसल्यास राज्यातील) कोणताही एक जिल्हा नोडल जिल्हा म्हणून घोषित करणे आवश्यक करण्यात आले आहे. विधानपरिषद सदस्यांना आर्थिक वर्षाकरिता अनुज्ञेय असलेला संपूर्ण निधी शासन स्तरावरून या नोडल जिल्ह्यास सुपूर्द केला जातो व तद्नंतर विधानपरिषद सदस्यांच्या शिफारशीनुसार या निधीचे पुढील वितरण त्या नोडल जिल्ह्यामार्फत केले जाते. विधानपरिषद सदस्याला त्यांच्या आर्थिक वर्षातील कार्यकालानुसार त्याप्रमाणात निधी अनुज्ञेय आहे.

आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत सन २०११-१२ या आर्थिक वर्षापासून विधानमंडळ सदस्यांना प्रती सदस्य रु. २००.०० लक्ष इतका निधी अनुज्ञेय करण्यात आला होता. तथापि, सदर निधीमध्ये वाढ करून सन २०२०-२१ या वर्षामध्ये प्रति विधानमंडळ सदस्य रु. ३००.०० लक्ष, तसेच सन २०२१-२२ या आर्थिक वर्षापासून प्रति विधानमंडळ सदस्य रु. ४००.०० लक्ष आणि सन २०२२-२३ या आर्थिक वर्षापासून प्रति विधानमंडळ सदस्य रु. ५००.०० लक्ष याप्रमाणे निधी अनुज्ञेय करण्यात आलेला आहे.

आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाकरिता प्रति विधानमंडळ सदस्य रु. ५००.०० लक्ष व गतवर्षीच्या पूर्ण झालेल्या कामांसाठी अधिकचा निधी याप्रमाणे एकूण रु. २२००००.०० लक्ष एवढा निधी अर्थसंकल्पीत करण्यात आलेला आहे. त्याचबरोबर आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरिता एकूण रु. १८३०००.०० लक्ष एवढी अर्थसंकल्पीय तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत सर्वसमावेशक मागदर्शक सूचना शासन निर्णय क्र. स्थाविका-०६१६/प्र.क्र.९६/का. १४८२, दि. १२ जुलै, २०१६ अन्वये निर्गमित करण्यात आल्या असून तद्नंतर काळानुरुप व लोकप्रतिनिधींच्या मागण्या विचारात घेऊन वेळोवळी सदर सूचनांमध्ये बदल करण्यात आले आहेत.

### ५. नक्षलग्रस्त भागाच्या जलद विकासासाठी विशेष कृती दल :-

नक्षलग्रस्त भागाच्या जलद विकासासाठी विशेष कृती कार्यक्रमांतर्गत गडचिरोली, गोंदीया, चंद्रपूर व भंडारा या चार जिल्ह्यांच्या जिल्हा समन्वय समितीस नियोजन विभाग शासन निर्णय क्रमांक नविका-१००९/ प्र.क्र. ६८/का-१४१५, दिनांक १७ डिसेंबर, २००९ अन्वये प्रतिवर्षी प्रती जिल्हा रुपये ५.०० कोटी प्रमाणे (नियोजन विभाग रु. ३.०० कोटी व आदिवासी विकास विभाग रू. २.०० कोटी) एकूण रु. २०.०० कोटी इतका निधी मंजूर करण्यात येतो. सन २०२६-२७ करिता उपरोक्त योजनेसाठी मागणी क्र. ओ-७ सीआरसी संकेतांक ३४५१०६५४ अंतर्गत रु. १२.०० कोटी इतकी अर्थसंकल्पिय तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

### ६. राज्यस्तरिय बँकर्स समिती

विविध शासकीय विभागांकडून राबविण्यात येणा-या योजनांच्या लाभार्थ्यांना राष्ट्रीयकृत बँकांमार्फत वित्त सहाय्य/ कर्ज उपलब्ध करण्याबाबत असलेल्या तरतुदीस अनुसरुन बँकांकडून होणाऱ्या कर्ज पुरवठयासंदर्भात राज्य स्तरीय बँकर्स समितीच्या बैठकीत चर्चा करण्यात येते. त्या अनुषंगाने राज्य शासन व राज्यातील राष्ट्रीयकृत बँकांचा फोरम यामधील दुवा या अर्थाने नियोजन विभाग नोडल विभाग आहे.

राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या बैठका दर तीन महिन्यांनी आयोजित करण्यात येतात. वर्षातील साधारण मे/जून महिन्यामध्ये राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या बैठकीत माननीय मुख्यमंत्री महोदयांबरोबर चर्चेअंती राज्याचा वार्षिक पत आराखडा अंतिम करण्यात येतो.

### ७. प्रादेशिक ग्रामीण बँकांना भाग भांडवल देणे

ग्रामीण भागातील लहान व मध्यम शेतकरी, कृषि क्षेत्रातील कामगार वर्ग आणि लहान उद्योग इत्यादींना कृषि, व्यापार, वाणिज्य,

उद्योग आणि इतर सुविधा मिळून ग्रामीण भागाचा आर्थिक विकास व्हावा यासाठी प्रादेशिक ग्रामीण बँकांची निर्मिती, नियंत्रण आणि समापन करणे या उद्देशाने प्रादेशिक ग्रामीण बँका अध्यादेश, १९७५ लागू करण्यात आला व सन १९७६ मध्ये सदर अध्यादेश अधिनियमात रुपांतरित झाला. प्रादेशिक ग्रामीण बँकांचे ध्येय हे सहकारी बँकांकडे असलेले स्थानिक ज्ञान आणि ग्रामीण भागातील प्रश्नांशी असलेला परिचितपणा आणि वाणिज्यिक बँकांकडील व्यावसायिकपणा, ठेवींची चलनशीलता, आधुनिक दृष्टी या दोन्हीचा मिलाप करणे हे होते.

या बँकांना पुन:पुंजीकरणासाठी "ग्रामीण बँकांना भागभांडवल देणे" या योजनेमधून अर्थसहाय्य देण्यात येते. यामध्ये केंद्रशासनाचा ५० टक्के हिस्सा, प्रवर्तक बँकांचा ३५ टक्के हिस्सा व महाराष्ट्र शासनाचा १५ टक्के हिस्सा आहे.

महाराष्ट्र राज्यात सध्या महाराष्ट्र ग्रामीण बँक ही प्रादेशिक ग्रामीण बँक कार्यरत असून सदर बँकेचे मुख्यालय छत्रपती संभाजीनगर येथे आहे व बँक ऑफ महाराष्ट्र ही पुरस्कर्ती बँक आहे. प्रादेशिक ग्रामीण बँकेच्या संचालक मंडळावर राज्य शासनाचे दोन प्रतिनिधी तीन वर्षांसाठी नियुक्त करण्यात आले आहेत.

सन २०२६-२७ या वित्तीय वर्षात मागणी क्रमांक ओ-१२, (००)(०१) ग्रामीण बँकांना भागभांडवल देणे (सीआरसी संकेतांक ५४६५००१९) या योजनेसाठी प्रादेशिक ग्रामीण बँकांना राज्य शासनाच्या १५% हिश्शाची पुनर्भांडवलीकरणासाठी रक्कम म्हणून रु. १.०० लक्ष इतकी अर्थसंकल्पिय तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

### ८. केंद्र व राज्य शासनाच्या बँकींगशी निगडित योजनांचा प्रचार, प्रसार व समन्वय :-

महाराष्ट्र शासन नियोजन विभागाच्या दिनांक ३१ मार्च २०२१ च्या शासन निर्णयान्वये केंद्र व राज्य शासनाच्या बँकींगशी निगडित योजनांचा प्रचार, प्रसार व समन्वय याकरिता जिल्हास्तरावर खालीलप्रमाणे जिल्हास्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे.

१) जिल्हाधिकारी — अध्यक्ष
२) मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद — सदस्य
३) प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा — सदस्य
४) जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी — सदस्य
५) जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी — सदस्य
६) जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था — सदस्य
७) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र विशेष निमंत्रित — सदस्य
८) सहाय्यक आयुक्त, कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता — सदस्य
९) जिल्हा माहिती अधिकारी — सदस्य
१०) जिल्हा व्यवस्थापक, राज्य शासनाचे मागासवर्ग विकास महामंडळ — निमंत्रित
११) सहायक प्रबंधक, नाबार्ड — सदस्य
१२) जिल्हा अग्रणी बँक अधिकारी — सदस्य
१३) जिल्ह्यातील प्रमुख बँकांचे समन्वयक अधिकारी — निमंत्रित
१४) जिल्हा नियोजन अधिकारी — सदस्य सचिव

या समितीकडून "केंद्र व राज्य शासनाच्या बँकींगशी निगडीत योजनांचा प्रचार, प्रसार व समन्वय" या योजनेंतर्गत माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाकडून निर्गमित शासन निर्णय / परिपत्रकाप्रमाणे प्रचार व प्रसिद्धीचे कामे हाती घेण्यात येतात. सन २०२६-२७ करिता मागणी क्र. ओ-७ (सीआरसी संकेतांक ३४५१ ए००१) अंतर्गत केंद्र व राज्य शासनाच्या बँकींगशी निगडीत योजनांचा प्रचार, प्रसार व समन्वय (कार्यक्रम) या योजनेसाठी रु. ४०.०२ लाख इतकी अर्थसंकल्पिय तरतूद प्रस्तावित आहे.

### ९ (अ) आकांक्षित जिल्हा कार्यक्रम (Aspirational District Program) :

केंद्र शासनाने देशातील ११२ जिल्ह्यांचा झपाट्याने कायापालट करण्यासाठी जानेवारी, २०१८ मध्ये "आकांक्षित जिल्हा कार्यक्रम" सुरू केला आहे. या जिल्ह्यांची निवड पारदर्शक प्रक्रियेतून करण्यात आली आहे. दुर्गमता आणि त्यांच्यासमोरील आव्हानांमुळे, विशेषत: आरोग्य आणि पोषण, शिक्षण, कृषि आणि जलसंपदा, कौशल्य विकास आणि आर्थिक समावेशन आणि पायाभूत सुविधा यांसारख्या क्षेत्रातील प्रगती या जिल्ह्यांमध्ये तुलनेने कमी होती. नवीन भारत-२०२२ च्या सर्वसमावेशक विकासासाठी, विकास प्रक्रिया टिकवून ठेवण्यासाठी या जिल्ह्यांमध्ये जलद प्रगती आवश्यक आहे. या कार्यक्रमांतर्गत राज्यातील नंदूरबार, धाराशिव, वाशिम व गडचिरोली या जिल्ह्यांचा समावेश आहे. या कार्यक्रमांतर्गत आरोग्य आणि पोषण (३०%), शिक्षण (३०%), कृषि आणि जलसंपदा (२०%) कौशल्य विकास आणि आर्थिक समावेशन (१०%) आणि मूलभूत पायाभूत सुविधा (१०%) या पाच क्षेत्रांमधील ४९ प्रमुख कामगिरी निर्देशकांमधील (Key Performance Indicators) कामगिरीच्या आधारे जिल्ह्यांना गुणवत्ता क्रमांक देण्यात येतो. राज्यातील आकांक्षित जिल्ह्यांना जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत मिळणाऱ्या मूळ नियतव्ययाव्यतिरिक्त रु. १५ कोटी टक्के अतिरिक्त नियतव्यय उपलब्ध करून देण्यात येत आहे.

### ९ (ब) आकांक्षित तालुका कार्यक्रम (Aspirational Block Program) :-

आकांक्षित जिल्हा कार्यक्रमाची यशस्विता लक्षात घेऊन सदर कार्यक्रम तालुक्यांपर्यंत पोहचविण्यासाठी केंद्र शासनाने आकांक्षित तालुका कार्यक्रम (Aspirational Block Program) सुरू केला आहे. देशातील तुलनात्मक मागास असलेल्या ५०० आकांक्षित तालुक्यांमध्ये हा कार्यक्रम राबविण्यात येणार असून त्यात आपल्या राज्यातील २७ तालुक्यांचा समावेश आहे.

या कार्यक्रमांतर्गत आरोग्य आणि पोषण (३०%) शिक्षण (३०%), कृषि आणि संलग्न सेवा (२०%), मूलभूत पायाभूत सुविधा (१५%) आणि सामाजिक विकास (५%) या पाच क्षेत्रांमधील ४० प्रमुख कामगिरी निर्देशकांमधील (Key Performance Indicators) कामगिरीच्या आधारे तालुक्यांना गुणवत्ता क्रमांक देण्यात येतो. या कार्यक्रमाचे संनियंत्रण नीति आयोगामार्फत केले जाते व राज्यस्तरावर ग्रामविकास विभागाच्या सहाय्याने तालुकास्तरिय समन्वय साधला जात आहे. राज्यातील १८ आकांक्षित तालुक्यांना (आकांक्षित जिल्ह्यांतील ९ तालुके वगळून) जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत मिळणाऱ्या मूळ नियतव्ययाव्यतिरिक्त रु. ५ कोटी अतिरिक्त नियतव्यय उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

**९ (क) आकांक्षित शहरे कार्यक्रम (Aspirational City Program) :-**

राज्यातील गावांचे वेगाने होणारे शहरीकरण व त्यातून नव्याने उद्‌भवलेल्या समस्यांवर मात करण्यासाठी शहरांचा समतोल, कालबद्ध व सर्वसमावेशक विकास करण्याच्या दृष्टीने राज्यात आकांक्षित शहरे कार्यक्रम राबविण्यात येत आहे. याबाबतचा शासन निर्णय दि. १३ एप्रिल, २०२३ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. या कार्यक्रमांतर्गत "ड" वर्ग महानगरपालिका, 'ब' व 'क' वर्ग नगरपरिषदा व नगरपंचायती- मधील ५७ शहरांची निवड करण्यात आली आहे. नागरी पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, प्रशासकीय गतीमानता, रोजगार, वित्तीय क्षमता, सामाजिक व सांस्कृतिक या क्षेत्रातील निवडक निर्देशकांचे सातत्यपूर्ण संनियंत्रण या कार्यक्रमांतर्गत करण्यात येणार आहे. आकांक्षित शहरे कार्यक्रमांतर्गत संनियंत्रण निर्देशक व त्याचे भारांश शा.नि. दि. १२ मे, २०२३ अन्वये निश्चित करण्यात आले आहेत.

# १०. रोजगार हमी योजना

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ही केंद्र शासनाची महत्त्वाकांक्षी योजना असून महाराष्ट्राच्या ३४ जिल्ह्यांमध्ये सदर योजना सन २००८ पासून राबविण्यात येत आहे. योजनेचे प्रमुख उद्दीष्ट ग्रामीण भागातील अकुशल मजुरांना रोजगार उपलब्ध करुन देऊन कायम स्वरुपात टिकाऊ मालमत्ता निर्माण करणे हे आहे. योजनेत सार्वजनिक तसेच वैयक्तिक लाभाच्या योजनांचा समावेश असून, भारतीय राज्यघटनेच्या कलम ४१ नुसार नागरिकांच्या कामाच्या हक्काचे रक्षण करण्यात येते.

**११. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना :-**

महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियमाची अंमलबजावणी १९७७ पासून महाराष्ट्रात सुरु झाली. राज्यात महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ नुसार दोन योजना सुरु होत्या :-

१) ग्रामीण भागात अकुशल व्यक्तींकरिता रोजगार हमी योजना

२) वैयक्तिक लाभाच्या योजना

सदर योजनांना राज्य शासनाच्या निधीतून अर्थसहाय्य केले जात होते.

सन २००५ मध्ये केंद्र शासनाने संपूर्ण भारतात राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम (विद्यमान नाव- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम) लागू केला. तसेच केंद्र शासनाने ज्या राज्यांनी पूर्वीपासूनच रोजगार हमी अधिनियम मंजूर केला होता, अशा राज्यांना केंद्र शासनाच्या अधिनियमातील कलम २८ अन्वये त्यांचा कायदा राबविण्याची मुभा दिली होती.

तद्नुसार महाराष्ट्र शासनाने सन २००६ मध्ये पूर्वीचा कायदा ठेवण्याचा पर्याय स्वीकारला आहे. मात्र विधानमंडळाने केंद्रीय कायद्यास अनुसरून राज्यास निधी मिळविण्याच्या अनुषंगाने १९७७ च्या कायद्यात आवश्यक त्या सुधारणा केल्या, त्यामुळे योजना राबविण्याच्या कार्यपद्धतीत बदल झाला आहे.

सद्य:स्थितीत राज्यात महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ (सन २०१४ मध्ये बदल केल्याप्रमाणे) अंमलात आहे व या कायद्यांतर्गत खालील दोन योजना सुरु आहेत.

अ) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना महाराष्ट्र (MGNREGS) या योजनेंतर्गत केंद्र शासन १०० दिवस प्रति कुटुंब रोजगाराची हमी देते व १०० दिवस प्रति कुटुंब मजुरीच्या खर्चासाठी निधी पुरवते. प्रति व्यक्ति १०० दिवसांवरील मजुरांच्या मजुरीच्या खर्चाचा आर्थिक भार राज्य शासन उचलते.

ब) महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ कलम (१२) (इ) नुसार वैयक्तिक लाभाच्या योजना अनुदान तत्वावर प्रतिपूर्ती योजना म्हणून राबविण्यात येतात.

**उदा. :** १) रोहयोंतर्गत फळबाग लागवड योजना

२) मातोश्री शेत/पाणंद रस्ते योजना

३) नागपूर विभागातील सिंचन विहिरींचा धडक कार्यक्रम

याशिवाय राज्य शासनाचा निधी पुढील बाबींकरिता वापरला जातो.

१) राज्य रोजगार हमी योजनेतील प्रगतीपथावरील अपूर्ण (कुशल) कामे पूर्ण करण्याकरिता.

२) राज्य रोजगार हमी योजनेंतर्गत भूसंपादन केलेल्या जमिनीचा मोबदला देण्याकरिता.

३) योजनेंतर्गत होणाऱ्या कुशल भागावरील खर्चाच्या २५% खर्च.

४) क वर्ग नगरपालिकांमध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत कामे सुरु करण्यात आली असून सूक्ष्म पाणलोट विकासावरही भर देण्यात आला आहे.

या योजनेचा खर्च व मनुष्यदिन निर्मितीबाबतचा गेल्या पाच वर्षांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| वर्ष | एकूण खर्च (कोटी) | मनुष्यदिन निर्मिती (कोटी) |
|---|---|---|
| २०२१ - २०२२ | २४२२.७५ | ८.२५ |
| २०२२ - २०२३ | ३०२४.२३ | ७.८७ |
| २०२३ - २०२४ | ४४६०.८२ | ११.५९ |
| २०२४ - २०२५ | ५९७२.२७ | १६.२१ |
| २०२५ - २०२६ | ५६९९.२ | १२.५१ |

दि. २२.०१.२०२६ रोजीपर्यंत

*** महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे उद्दीष्ट-**

अकुशल काम करण्यास इच्छुक असणाऱ्या प्रत्येक कुटुंबातील प्रौढ व्यक्तीला योजनेंतर्गत १०० दिवस प्रति कुटुंब रोजगाराची हमी देण्यात आली असून, त्या माध्यमातून स्थायी स्वरुपाची मालमत्ता निर्माण करणे हे या योजनेचे मूळ उद्दिष्ट आहे. त्याचप्रमाणे ग्रामीण भागातील शेतकरी/शेतमजुरांना या अधिनियमाच्या माध्यमातून रोजगाराचा हक्क प्रदान करणे, सामाजिक सुरक्षा देणे, महिला व दुर्बल घटकांचे सबलीकरण करणे, तसेच पंचायत राज संस्थांचे बळकटीकरण करण्यावर योजनेत भर देण्यात आला आहे.

योजनेंतर्गत सार्वजनिक व वैयक्तिक लाभाची कामे घेता येतात. सार्वजनिक कामांपैकी प्रामुख्याने जलसंधारण व जलसंवर्धनाची कामे, दुष्काळ प्रतिबंधक कामे (वनीकरणासह), रस्त्याची कामे घेण्यात येतात. वैयक्तिक लाभाच्या कामांमध्ये अनुसुचित जाती/जमाती, दारिद्र्यरेषेखालील, भू-सुधार खालील व इंदिरा आवास योजनेचे लाभार्थी, लहान व सीमांत शेतकरी यांच्या जमिनीसाठी जलसिंचन निर्माण करणारी कामे, फळबाग लागवड व भू-सुधार कामे, तसेच कृषि संदर्भातील कामे, पशुधन संदर्भातील कामे, मत्स्यव्यवसाय आनुषंगिक कामे, ग्रामीण क्षेत्रात पिण्याच्या पाण्यासंबंधी तसेच ग्रामीण स्वच्छतेसंबंधी कामे घेण्यात येतात.

*** मजुरी दर**

सन २०११ पासून केंद्र शासन महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी कायदा, २००५ मधील कलम ६ नुसार प्रत्येक वर्षी मजुरी दर निश्चित करते. त्यानुसार केंद्र शासनाने दि. ०१ एप्रिल, २०२५ च्या

अधिसूचनेन्वये सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरिता महाराष्ट्रासाठी रु. ३१२/- प्रतिदिन इतका मजूरी दर निश्चित केला आहे. केंद्र शासन प्रत्येक वर्षी मजुरीचे दर ठरविते व ते केलेल्या कामाच्या प्रमाणात (मोजमापानुसार) मजुरांना अदा केले जाते.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ही केंद्र शासन पुरस्कृत योजना आहे. केंद्र शासनामार्फत अनुज्ञेय करण्यात आलेल्या एकूण २६६ कामांचा समावेश या योजनेमध्ये करण्यात येतो. सदर योजनेंतर्गत प्रत्येक जॉबकार्ड धारकाला रोजगाराची हमी दिली जाते.

*** फळबाग योजना**

विभागाच्या दिनांक ३०.०३.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये 'महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी' योजनेंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्याच्या सलग शेतावर, शेताच्या बांधावर व पडीक जमिनीवर अमृत महोत्सवी फळझाड/वृक्ष लागवड व फुलपिक लागवड कार्यक्रम राबविण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. यामध्ये समाविष्ट असलेल्या पिकांसोबतच खालील पीके नव्याने समाविष्ट करण्यात आलेली आहेत. १) केळी (३ वर्ष) २) ड्रॅगनफ्रुट ३) ॲव्हाकॅडो ४) द्राक्ष, फुलझाड - सोनचाफा, मसाल्याची पिके - १) लवंग, २) दालचिनी, ३) मिरी ४) जायफळ

पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या दिनांक ११ सप्टेंबर, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये बांबू व इतर झाडांच्या लागवडीला प्रोत्साहन देण्यासाठी राज्यात सुरु करण्यात येणाऱ्या हरित महाराष्ट्र कार्यक्रमाची रचना निश्चित करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयान्वये करावयाची लागवड मुख्यत्वे मनरेगांतर्गत करावयाची आहे. त्यानुसार फलोत्पादन, रेशीम शेती, फुलशेती, कुरण विकास, औषधी वनस्पती आणि इतर वृक्षांसाठी १० लाख हेक्टर क्षेत्रावर उद्दिष्ट देण्यात आले आहे. मनरेगा अंतर्गत महाराष्ट्र शासनाने बांबू व इतर झाडांच्या शाश्वत लागवडीला प्रोत्साहन देण्याकरिता राज्यात सुमारे ११ लाख हेक्टर क्षेत्रावर बांबू लागवडीचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे.

बांबू लागवड कार्यक्रमांतर्गत मोठया प्रमाणावर गुणवत्तापूर्ण रोपे उपलब्ध करुन घेणे आवश्यक असल्याने तसेच लाभार्थी स्वखर्चाने रोपे उपलब्ध करुन घेण्यास सक्षम नसल्यामुळे व रोपांच्या किंमती आणि निवडीबाबतही लाभार्थ्यांमध्ये विविधता येण्याची शक्यता विचारात घेऊन गुणवत्तापूर्ण आणि मोठ्या प्रमाणात रोपे उपलब्ध करण्यासाठी दिनांक २१ ऑगस्ट, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत बांबू लागवडीसाठी Expression Of Interest द्वारे रोपे खरेदी करण्याकरिता १) ईशवेद बायोटेक प्रायव्हेट लिमिटेड, २) अल्माक बायेटेक एल. एल. पी. व ३) ग्रोमोअर बायोटेक लिमिटेड या तीन संस्थांची निवड Empanelment Agency मध्ये करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयान्वये पुढील बांबू प्रजातींचा समावेश करण्यात आला आहे. १)Bambusa Balcooa, २) Dendrocalamus Brandisii, ३)Bambusa Nutans, ४) Dendrocalamus Asper, ५) Bambusa Tulda, ६) Dendrocalamus Strictus, ७) Oxytenenthara Stocksii व ८) Valgaris Green.

सन २०२३-२४ व सन २०२४-२५ मध्ये उक्त संस्थांमार्फत ५२,९३,६९३ इतकी बांबूची टिश्यू कल्चरची रोपे राज्यात पुरविण्यात आली आहेत.

विभागाच्या दिनांक १८.०५.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत कांदे साठवण करण्याचे गोदाम म्हणून कांदाचाळ उभारण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच विभागाच्या दिनांक ०९ जुलै, २०२४ रोजीच्या शासन शुद्धिपत्रकान्वये कांदाचाळ सामुदायीकरित्या शेतकरी किंवा स्वयंसहाय्यता बचत गट किंवा शेतकऱ्यांचे उत्पादक गट/संघ याचा लाभ घेऊ शकतात असा बदल करण्यात आलेला आहे.

विभागाच्या दिनांक ०६ सप्टेंबर, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत रेशीम उद्योग विकास योजना रेशीम संचालनालयासह कृषी विभाग व पंचायत विभागामार्फत राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत कृषी विभागामार्फत सन २०२४-२५ मध्ये देण्यात आलेल्या एकूण ६०,००० हेक्टर इतक्या लक्ष्यांकापैकी ४५,९५५.७५ हेक्टर क्षेत्रावर फळबाग लागवड झाली आहे. तसेच सामाजिक वनिकरणामार्फत १५२९.२५ हेक्टर क्षेत्रावर वृक्ष लागवड झाली आहे.

नरेगा संकेतस्थळावरील आकडेवारीनुसार सद्य:स्थितीत सन २०२५-२६ मध्ये एकूण १,७५,२२६ फळबाग लागवडीची कामे प्रगतीपथावर असून, त्यापैकी ३४,८०० फळबाग लागवडची कामे पूर्ण झाली आहेत. कृषी विभागामार्फत सन २०२५-२६ मध्ये देण्यात आलेल्या एकूण ५०,००० हेक्टर इतक्या लक्ष्यांकापैकी ४१,२१८.४४ हे. इतक्या क्षेत्रावर फळबाग लागवड झाली आहे. सन २०२५-२६ मध्ये सामाजिक वनिकरण विभागामार्फत १२२३.२४ हे. क्षेत्रावर वृक्ष लागवड झाली आहे.

*** नागपूर विभागातील सिंचन विहीरींचा धडक कार्यक्रम**

विभागाच्या दिनांक ०६ फेब्रुवारी, २०१९ च्या शासन निर्णयान्वये नागपूर विभागातील सिंचन विहिरींच्या धडक कार्यक्रमांतर्गत अतिरिक्त १३,००० सिंचन विहिरींचे उद्दिष्ट ठेवण्यात येऊन त्याकरिता रु. १४१.०० कोटी इतका निधी विभागीय आयुक्त, नागपूर यांना वितरित करण्यात आलेला होता.

सदर उद्दिष्टापैकी फक्त ३६३७ विहिरींचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. विभागाच्या दिनांक १७ ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर कार्यक्रमांतर्गत अपूर्ण/प्रगतीपथावरील असलेल्या ३८६ विहिरी पूर्ण करण्यासाठी दिनांक ३१ मार्च, २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली असून, तद्नंतर सदर योजना कायमस्वरुपी पूर्ण झाली असल्याचे समजण्यात येईल असा निर्णय घेण्यात आलेला आहे.

*** सन २०२५-२६ मधील अतिवृष्टी/पूरस्थिती यामुळे खचलेल्या व बुजलेल्या सिंचन विहिरींची दुरुस्ती कार्यक्रम**

विभागाच्या दिनांक १३ ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये सन २०२५-२६ या वर्षाच्या खरीप हंगामातील अतिवृष्टी/पूरस्थिती

यामुळे खचलेल्या व बुजलेल्या सिंचन विहिरींच्या दुरुस्तीच्या कामांसाठी अर्थसहाय्य देण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयान्वये प्राप्त अहवालाच्या आधारे अतिवृष्टीमुळे खचलेल्या व बुजलेल्या सिंचन विहिरींच्या दुरुस्तीच्या कामांच्या प्रत्यक्ष खर्चास किंवा प्रती विहिर कमाल मर्यादा रु. ३०,०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल ती अनुज्ञेय करण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच सदर योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यास अनुज्ञेय असलेल्या अंदाजपत्रकीय खर्चाच्या ५०% रक्कम (कमाल रु. १५०००/- मर्यादा) आगाऊ स्वरुपात संबंधित लाभार्थ्यांना जिल्हाधिकारी यांच्यामार्फत उपलब्ध करुन देण्याचे निर्देश देण्यात आले आहे.

सर्व विभागीय आयुक्त यांच्याकडून प्राप्त झालेल्या आकडेवारीप्रमाणे पंचनामा केलेल्या खचलेल्या बुजलेल्या विहिरींची संख्या २७४३८ इतकी आहे. मदत व पुनर्वसन विभागाची आकडेवारी विचारात घेऊन विभागाच्या दिनांक १७ नोव्हेंबर, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये खचलेल्या व बुजलेल्या सिंचन विहिरींच्या दुरुस्तीच्या कामांसाठी अग्रीम म्हणून रु.१८.५६ कोटी इतका निधी सर्व विभागीय आयुक्त यांच्याकडे वितरित करण्यात आलेला आहे. तसेच अधिकचा निधी आवश्यकतेप्रमाणे संबंधित जिल्हाधिकारी यांच्या मागणीनुसार उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे. .

*** राज्य रोजगार हमी योजनेतील भूसंपादन :**

जुन्या राज्य रोजगार हमी योजनेंतर्गत घेण्यात आलेल्या पाझर तलावांच्या कामासाठी भूसंपादनाची कार्यवाही करण्यात आली होती. रोजगार हमी योजनेतील ज्या पाझर तलावांच्या कामांसाठी भूधारकांच्या जमिनी संपादीत करण्यात आलेल्या आहेत, अशा भूधारकांना भूसंपादन अधिनियम, १८९४ अन्वये तसेच १८९४ च्या कायद्यातील प्रक्रिया व्यपगत झालेल्या प्रकरणांमध्ये नवीन भूसंपादन कायदा, २०१३ मधील तरतुदीनुसार भूधारकास मोबदला देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येते. सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षासाठी लेखाशीर्ष २५०५ ००२२(५०) व लेखाशीर्ष २५०५०३८१ या लेखाशिर्षाखाली अनुक्रमे रु. १८५.०० व रु. १२०.०० कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे.

*** ग्रामरोजगार सेवक**

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायद्यातील तरतुदीनुसार ग्रामपंचायत हे कामाच्या नियोजनाच्या संदर्भात मूळ घटक आहे. सदर योजनेंतर्गत ग्रामपंचायती अंतर्गत ग्राम पातळीवर ग्रामसेवकांना मदत करण्यासाठी ग्रामरोजगार सहायक यांची ग्रामसभेमार्फत अर्धवेळ कमचारी म्हणून नेमणूक करण्यात येते.

राज्यातील कार्यरत ग्रामरोजगार सहायकांना प्रतिमाह रु. ८,०००/- मानधन व इतर आनुषंगिक भत्ते देण्यासंदर्भात दि. ०३.१०.२०२४ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयाची अंमलबजावणीकरिता विभागास नवीन लेखाशीर्ष (२५०५ A२१८) प्राप्त झाले असून ग्रामरोजगार सहायकांना मानधन अदा करण्याच्या अनुषंगाने रू.१००० इतक्या लाक्षणिक पुरवणी मागणीचा प्रस्ताव मान्य झालेला आहे.

*** नागरी भागातील रोजगार हमी योजना**

महाराष्ट्र राज्यात महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ नुसार ग्रामीण कुटुंबांना अकुशल रोजगाराची वैधानिक हमी देण्यात आली आहे. तथापि, केंद्र शासनाच्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम, २००५ अन्वये देशभरातील ग्रामीण कुटुंबांना १०० दिवसांची अकुशल रोजगाराची वैधानिक हमी देण्यात आली आहे. उक्त केंद्रीय अधिनियमानुसार राज्यातही निधी उपलब्ध व्हावा याकरिता केंद्रीय अधिनियमातील तरतुदींचा राज्याच्या अधिनियमात समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्यात सध्या महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ अंतर्गत केंद्र शासनाची `महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र व राज्य शासनाची-राज्य रोजगार हमी योजना या दोन योजना राबविण्यात येतात.

महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ (दिनांक ०६ ऑगस्ट, २०१४ पर्यंत सुधारित) मधील प्रकरण सहा मधील कलम १२-ड नुसार नागरी क्षेत्रांमध्ये योजनेची अंमलबजावणी करण्याची तरतूद करण्यात आली आहे. यामध्ये-नागरी क्षेत्र याचा अर्थ 'क' वर्ग नगपरिषद किंवा नगरपंचायतीचे स्थानिक क्षेत्र असा आहे. या अनुषंगाने, नियोजन विभागाच्या शासन निर्णय, क्र. मग्रारोहयो २०१२/ प्र.क्र.५५/रोहयो १०, दिनांक ०३ मार्च, २०१४ अन्वये महाराष्ट्रात 'क' वर्ग नगरपरिषद/नगरपंचायत क्षेत्रात राज्य रोजगार हमी योजनेची राज्यात अंमलबजावणी करण्याबाबत तपशीलवार सूचना देण्यात आल्या आहेत. सदर शासन निर्णयानुसार महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेप्रमाणे सामुग्री व कुशल भागावरील खर्चाच्या २५% रक्कम नगरपरिषद/नगरपंचायत निधीतून करणे आवश्यक आहे. सदर शासन निर्णयामध्ये सदर योजनेंतर्गत अनुज्ञेय असलेल्या कामांची यादी शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट-१ मध्ये जोडली आहे. यामध्ये जलसंधारण व जलसंवर्धन कामे, वनिकरण व वृक्षलागवड, नाले व तलावातील गाळ काढणे, भूविकासाची कामे, पूरनियंत्रण / पूरसंरक्षक कामे, दफनभूमी/ कब्रस्तान रस्ते इ. प्रकारच्या कामांचा समावेश आहे. या अनुषंगाने अकुशल रोजगाराची पूर्तता, दीर्घकालीन टिकणारी कामे व त्याद्वारे सामाजिक पायाभूत सोयी उपलब्ध करून देणे व कायमस्वरूपी मालमत्ता तयार होईल अशा प्रकारे योजने अंतर्गत कामे घेण्यास प्राधान्य देण्यात येते.

**मातोश्री ग्रामसमृद्धी शेत/पाणंद रस्ते योजना**

शेतीच्या कामांकरिता मनुष्यबळाच्या कमी उपलब्धतेमुळे शेतीमध्ये पेरणी, आंतरमशागत, कापणी, मळणी व इतर कामांकरिता यांत्रिकीकरण आवश्यक झाले आहे. तसेच, शेती व्यवसाय किफायतशीर होण्यासाठी शेतातून पिकांची योग्य वेळी काढणी होऊन शेतमाल योग्यवेळी बाजारात पोहचणे आणि पीक पद्धतीतील विविधता (Crop Diversification) अगत्याचे झाले आहे. यंत्रसामुग्री शेतापर्यंत जाण्यासाठी, योग्यवेळी शेतमाल बाजारात पोहचवण्यासाठी आणि पीक पद्धतीत विविधता (Crop Diversification) आणण्यासाठी बारमाही उपयोगाचे शेतरस्ते अपरिहार्य झाले आहेत. तसेच शेतरस्ते हे

योजनाबाह्य रस्ते असल्याने सदर रस्त्यांच्या कामांकरिता अन्य योजनांमधून निधी उपलब्ध होण्यास अडचणी येतात.

राज्यातील शेत/पाणंद रस्त्यांची मोठ्या प्रमाणातील संख्या व लांबी आणि या शेत/पाणंद रस्त्यांच्या कामांकरिता लागणाऱ्या निधीची तरतूद राज्याच्या अर्थसंकल्पीय तरतुदीतून पूर्ण करणे शक्य नाही. सदर बाबी विचारात घेऊन मा. मंत्रिमंडळाच्या मान्यतेस अनुसरुन दिनांक ११/११/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये विविध योजनांच्या अभिसरणातून मातोश्री ग्रामसमृद्धी शेत/पाणंद रस्ते योजना राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे.

**मातोश्री ग्रामसमृद्धी योजनेचे स्वरुप :**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत (मनरेगा) शेत/पाणंद रस्त्यांची कामे अनुज्ञेय आहेत. तथापि, सदर कामांवरील खर्चामध्ये साहित्यावरील खर्चाचे प्रमाण जास्त असल्याने सदर कामांवरील मजुरी (अकुशल) आणि साहीत्य (कुशल) यांवरील खर्चाचे अनुक्रमे ६०:४० असे प्रमाण राखण्यास मर्यादा येतात. सदर प्रमाण राखण्याकरिता राज्य रोजगार हमी योजनेतून पूरक कुशल अनुदान शासनस्तरावरुन उपलब्ध करण्यात येते. अशा प्रकारे मनरेगा आणि राज्य रोहयो यांच्या अभिसरणातून मातोश्री ग्रामसमृद्धी शेत/ पाणंद रस्ते योजना राबविण्यात येते.

मनरेगांतर्गत अनुज्ञेय असलेल्या विविध कामांच्या परस्पर संयोजनातून सदर कामांवरील मजुरी (अकुशल) आणि साहीत्य (कुशल) यांवरील एकुण खर्चाचे अनुक्रमे ६०:४० असे प्रमाण राखून देखील शेत/पाणंद रस्त्यांची कामे घेण्यास सदर योजनेंतर्गत मान्यता देण्यात आली आहे.

मनरेगा आणि अन्य केंद्रीय/राज्य शासनाच्या योजना यांच्या अभिसरणातून देखील शेत/पाणंद रस्त्यांची कामे घेण्यास सदर योजनेंतर्गत मान्यता देण्यात आली आहे.

**मातोश्री ग्रामसमृद्धी शेत/पाणंद रस्ते योजनेंतर्गत रस्त्यांची पुढीलप्रमाणे कामे करण्यात येतात.**

i) अस्तित्वातील शेत/पाणंद कच्च्या रस्त्यांचे मजबुतीकरण करणे.

ii) शेत/पाणंद रस्ता अतिक्रमणमुक्त करुन कच्चा व पक्का रस्ता एकत्रितपणे करणे.

iii) शेत/पाणंद रस्ता अतिक्रमणमुक्त करुन कच्चा रस्ता तयार करुन मजबुतीकरण करणे.

*** अस्तित्वातील शेत/पाणंद कच्च्या रस्त्यांचे मजबुतीकरण करणे :**

शेत/पाणंद कच्चा रस्ता मजबुतीकरण करताना दोन्ही बाजूने चर खोदून त्यामधून निघणारी माती/मुरुम ही शेत/पाणंद रस्त्यामधील भागात टाकण्यात येऊन त्यावर व्यवस्थित रोलरने दबाई करण्यात येते. रस्त्याचा भाग हा काळ्या मातीतून जात असल्यास भरावावर किमान ३०० मि.मी. जाडीचा कठीण मुरुम टाकण्यात येतो व त्यावर रोलरने व्यवस्थितरित्या पाणी शिंपडून दबाई करण्यात येते.

*** शेत/पाणंद रस्ता अतिक्रमणमुक्त करुन कच्चा व पक्का रस्ता एकत्रितपणे करणे :**

वरीलप्रमाणे शेत/पाणंद रस्त्यांच्या कामांचे मुरुम टाकून मजबुतीकरण झाल्यावर मुरुमावर खडीकरण करणे आवश्यक असल्यास त्यासाठी वापरण्यात येणाऱ्या खडीची एकूण जाडी २२५ मि.मी. असणे आवश्यक आहे. त्यातील खालच्या थराच्या खडीची जाडी १५० मि.मी. आवश्यक असून त्या खडीचा आकार ग्रामीण रस्ते संहिता (Rural Road Manual) नुसार Grading I (७५mm to ४.७५mm) असणे व वरील थराच्या खडीची जाडी ७५ मि.मी. असून त्या खडीचा आकार Grading II (५३mm to ४.७५mm) असणे आवश्यक आहे. भरावात वापरण्यात येत असलेला मुरुम कठीण असणे आवश्यक आहे व खडीकरणासाठी ३०% पर्यंत पकडीसाठी हलका मुरुम वापरण्यात येतो.

CD Work- नळकांडी पूल बांधताना शक्यतो सिमेंट पाईपचा वापर करण्यात येतो. तथापि, सिमेंट पाईप टाकल्यानंतर दोन्ही बाजूने किमान M-१० काँक्रिटच्या भिंती (Head Wall) असणे आवश्यक असून त्यामुळे रस्त्याचा भराव खचत नाही व CD Work चे आयुष्य वाढते. माती मुरुमाचा भराव करताना रस्त्याच्या मध्यापासून दोन्ही बाजूने उतार (Camber) देणे आवश्यक आहे. त्यामुळे रस्त्यावर पावसाचे पाणी साचणार नाही.

*** शेत/पाणंद रस्त्यावरील अतिक्रमण हटवून कच्च्या रस्त्याचे मजबुतीकरण करणे :**

ज्या ठिकाणी शेतकऱ्याची सहमती आहे, अशा ठिकाणी अर्थमुव्हर उत्खनन यंत्राच्या सहाय्याने योग्य आखणी करुन दोन्ही बाजूने चर खोदून त्यामधून निघणारी माती/मुरुम शेत/पाणंद रस्त्यामधील भागात टाकण्यात यावी. तसेच चरात खोदून निघालेली माती/मुरुम योग्य प्रमाणात पसरवून रस्त्यांचा कच्चा भराव तयार करण्यात यावा. असा कच्चा रस्ता तयार करण्याकरिता टायर असलेले बॅकहो लोडर व एक्सकॅव्हेटर (७० HP पेक्षा अधिक क्षमता असलेले जेसीबी इत्यादी अर्थमुव्हर) याकरिता १०० तास प्रति किलोमीटर व चेन असलेले एक्सकॅव्हेटर (२०० HP पेक्षा अधिक क्षमता असलेले पोकलेन इत्यादी अर्थमुव्हर) करिता ४० तास प्रति किलोमीटर अनुज्ञेय आहे. यापेक्षा प्रति किलोमीटर अधिक तास लागत असल्यास तालुकास्तरीय समितीची मान्यता आवश्यक आहे.

मातोश्री ग्रामसमृद्धी शेत/पाणंद रस्ते योजनेंतर्गत मनरेगा आणि राज्य रोहयो या योजनांच्या अभिसरणातून करावयाच्या शेत/पाणंद रस्त्यांच्या कामांचा सन २०२५-२६ या आर्थिक वर्षांच्या कालावधीत सुमारे १७ हजार कि.मी. लांबीसह आराखडा शासनस्तरावरुन मंजूर करण्यात आला आहे.

**मातोश्री ग्रामसमृद्धी शेत/पाणंद रस्ते योजनेकरिता निधी**

राज्यस्तरिय समितीच्या शिफारशीनुसार शासन निर्णय, दिनांक ०९ फेब्रुवारी २०२४ अन्वये मातोश्री ग्रामसमृद्धी शेत/पाणंद रस्ते योजनेत सुधारणा करण्यात आल्या आहेत. त्यानुसार शासनस्तरावरुन मान्यताप्राप्त शेत/पाणंद रस्त्यांच्या कामांकरिता प्रत्येकी एक किलोमीटर लांबीच्या

मातीकामासह खडीकरण या प्रकारच्या कामाकरिता कमाल रु. १५ लाख आणि केवळ खडीकरण या प्रकारच्या कामासाठी कमाल रु.१३ लाख इतकी राज्य रोजगार हमी योजनेंतर्गत पूरक कुशल अनुदानाची मर्यादा विहित करण्यात आली आहे. तसेच, सदर दोन्ही प्रकारच्या कामांकरिता प्रत्येक एका किलोमिटरसाठी किमान रु. ३.०० लाख इतका मजुरीवरील (अकुशल) खर्च आणि सदर अकुशल खर्चाच्या दोन तृतीयांश साहित्यावरील (कुशल) खर्च म्हणजेच रु. २.०० लाख असा एकुण ५.०० लाख इतका खर्च मनरेगा योजनेंतर्गत करणे आवश्यक करण्यात आले आहे.

### १२. महाराष्ट्र इन्स्टिट्युशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्र)

शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक:-नितीआ-२०२२/प्र.क्र.३७ (भाग-१)/का- १४१२, दिनांक ११ नोव्हेंबर, २०२२ अन्वये निती आयोगाच्या धर्तीवर राज्यात महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्र) ची स्थापना करण्यात आली आहे.

२. निती आयोगाच्या धोरणाशी सुसंगत आणि राज्याच्या गरजा विचारात घेऊन खाजगी क्षेत्र आणि अशासकीय संस्थांच्या सहभागाच्या माध्यमातून राज्याचा जलद आणि सर्वसमावेशक विकास साधणे हा "मित्र" च्या स्थापनेमागचा मुख्य हेतू आहे. मित्रची कार्ये खालीलप्रमाणे आहेत :-

१) राज्याच्या विकासाला धोरणात्मक, तांत्रिक तसेच कार्यात्मक दिशा देणारा विचार गट (Think Tank) म्हणून कार्य करेल.

२) राज्याचे निर्धारित उद्दिष्ट साध्य करण्याच्या हेतूने शासनाच्या विविध विभागांना सक्षम करण्यासाठी उपाययोजना करणे.

३) विविध विभाग, भारत सरकार, निती आयोग, सिव्हिल सोसायटी, विविध अशासकीय संस्था, तसेच खाजगी व्यावसायिक संस्था यांच्यात संवाद घडवून आणून विकासाच्या नवीन उपाययोजना सुचविणे.

४) "मित्र"द्वारे कृषि व संलग्न क्षेत्र, आरोग्य व पोषण, शिक्षण, कौशल्य विकास व नाविन्यता, नागरीकरण व बांधकाम क्षेत्र विकास आणि भूमी प्रशासन, वित्त, पर्यटन आणि क्रीडा, ऊर्जा संक्रमण आणि वातावरणीय बदल, उद्योग आणि लघु उद्योग, पायाभूत सुविधा, माहिती तंत्रज्ञान, पूरक सेवा व दळणवळण अशा १० क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करणे, तसेच पर्यावरण, वने व वन्यजीव संरक्षण, या क्षेत्रांवर विशेष लक्ष देणे.

५) या क्षेत्रांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी व संनियंत्रणासाठी पूरक असणारे नाविन्यपूर्ण क्षेत्र-ड्रोन टेक्नॉलॉजी, कृत्रिम बुद्धीमत्ता (Artificial Intelligence) व मशिन लर्निंग, Internet of Things (I.O.T.) Cloud Computing, सायबर सुरक्षा (Cyber Security), Robotics, GIS, Block chain यांचा वापर करणे.

६) आकांक्षित तालुके/शहरे उपक्रम राबविणे. या उपक्रमांच्या माध्यमातून तुलनेने कमी प्रगत असलेल्या तालुका/शहरांमध्ये नियोजनबद्ध कार्यक्रम/योजना राबविणे तसेच त्यांच्या प्रगतीचा वेळोवेळी आढावा घेणे.

७) राज्य सरकारला आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था आणि सीएसआर ट्रस्ट फंड यांच्याकडून विकासात्मक उपक्रमांसाठी राज्य शासनाच्या मालमत्तेचे मुद्रीकरण (Asset Monetisation) आणि सवलतींचा वित्तीय पुरवठा यांसारख्या नाविन्यपूर्ण साधनांद्वारे अर्थसंकल्पबाह्य संसाधने निर्माण करण्यासाठी सल्ला देणे.

८) राज्य शासनाच्या विविध विभागांना मदत करीत असताना स्थानिक पातळीवरील नियोजन आणि विकासात्मक कार्यक्रमांच्या अंमलबजावणीत सुधारणा करण्यासाठी जिल्ह्यांना डेटा ॲनॅलिटिक्सच्या माध्यमातून सहाय्य करणे. अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांची कार्यक्षमता सुधारण्यासाठी परिणाम-आधारित रिअल-टाईम मूल्यांकनाच्या माध्यमातून मदत देणे आणि समवर्ती अभिप्राय प्रदान करणे.

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरिता रु. ३५.७२ कोटीचा नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**मित्र या संस्थेकडून खालील प्रकल्पांची अंमलबजावणी करण्यात येत आहे :**

**(क) जागतिक बँक सहाय्यित महाराष्ट्र जिल्हास्तरिय विकासास चालना देण्यासाठी संस्थात्मक क्षमता सक्षमीकरण प्रकल्प (महास्ट्राईड) :-** जागतिक बँक सहाय्यित महाराष्ट्र जिल्हास्तरिय विकासास चालना देण्यासाठी संस्थात्मक क्षमता सक्षमीकरण प्रकल्प (Maharashtra Strengthening Institutional Capabilities in Districts for Enabling Growth Project-MahaSTRIDE) राबविण्यास दिनांक १४ मार्च, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. सदर प्रकल्पाचा अंमलबजावणी कालावधी पाच वर्षांचा असून, प्रकल्पाचा अंदाजित खर्च रु. २२५९ कोटी (USD २६८.९७ मिलियन) इतका असून सदर प्रकल्पाच्या कार्यान्वयनासाठी आवश्यक असलेल्या एकूण निधीपैकी ७०% (अंदाजित रु. १,५८१.३ कोटी/USD १८८.२८ मिलियन) निधी जागतिक बँकेकडून कर्जाद्वारे व उर्वरित ३०% (अंदाजित रु. ६७७.७ कोटी/USD ८०.६९ मिलियन) निधी राज्य शासनाकडून उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या कर्जाची अंमलबजावणी दिनांक १० मार्च, २०२५ पासून सुरु झाली आहे. सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी बाह्य हिस्सा ७० टक्के रु. ७५.६७ कोटी (जागतिक बँक), राज्य हिस्सा ३० टक्के रु. ३२.४३ कोटी व फलश्रुतीआधारीत घटकांसाठी बाह्य हिस्सा ७० टक्के रु. २१९ कोटी (जागतिक बँक) याप्रमाणे तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे. यामध्ये वेतन या उद्दीष्टासाठी रु. ६.५४२ कोटी व कंत्राटी सेवेतील कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी रु. ९०.८३ कोटी रकमेचा समावेश आहे. सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने प्रकल्प समन्वय समिती (Project Co-ordination Committee) व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (Project Management Unit) हे "मित्र" संस्थेंतर्गत स्थापन करण्यात आले आहेत. तसेच प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी विविध विभागांत प्रकल्प अंमलबजावणी कक्ष आणि विभागीय व जिल्हास्तरावर District Strategic Unit कार्यरत असणार आहेत.

महाराष्ट्र राज्य आधारसामग्री धोरण- २०२४ हे दिनांक १७ एप्रिल, २०२५ रोजी जाहीर करण्यात आले असून राज्य आधारसामग्री प्राधिकरण कार्यान्वित करण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक १० नोव्हेंबर, २०२५ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

(ख) **महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम (MRDP)-** कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील कृष्णा, भीमा खोऱ्यातील पूर आपत्ती नियंत्रणासाठी जागतिक बँकेच्या सहाय्याने महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम (MRDP) राबविण्याबाबत राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता मिळाल्यानुसार दिनांक १३ मार्च,२०२४ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. सदर प्रकल्प रु. ३२००.०० कोटीचा (४०० दशलक्ष US $) चा आहे. सदर रकमेच्या ७० % म्हणजेच रु. २२४०.०० कोटी (२८० दशलक्ष US $) इतके अर्थसहाय्य जागतिक बँकेकडून घेण्यात येणार आहे. प्रकल्प खर्चाच्या उर्वरित ३०% निधी म्हणजेच ९६०.०० कोटी (१२० दशलक्ष US $) इतका खर्च राज्य शासनाकडून करण्यात येईल. सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी बाह्यसहाय्य हिस्सा ७० टक्के रु. ५८२.९४६ कोटी (जागतिक बँक), राज्य हिस्सा ३० टक्के रु. ३४८.७३५ कोटी याप्रमाणे तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे. सदर प्रकल्प राबविण्यासाठी मित्र कार्यालयामध्ये प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (PMU) व इतर ५ विभागांना प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (PIU) निर्माण करण्यात आले आहेत.

(ग) **महाराष्ट्र शहरी पाणीपुरवठा, स्वच्छता आणि पुनर्वापर कार्यक्रम (MUWREP) :-** मध्यम आणि लहान शहरांमधील सांडपाण्यावर प्रक्रिया करुन त्याचा पुनर्वापर करण्याच्या उद्देशाने आणि शहरी सांडपाणी व्यवस्थापनात परिवर्तन घडवून आणण्यासाठी महाराष्ट्र शहरी पाणीपुरवठा, स्वच्छता आणि पुनर्वापर कार्यक्रम (MUWREP) हा १७५ दशलक्ष अमेरिकन डॉलर्सचा कार्यक्रम जागतिक बँकेच्या सहकार्याने राबविण्यात येणार आहे. या कार्यक्रमामध्ये मध्यम आणि लहान शहरांमधील गंभीर सांडपाणी प्रश्नावर उपाययोजनेच्या दृष्टीने सांडपाणी व्यवस्थापन सुधारुन आणि सांडपाणी संकलन जाळ्याचा विस्तार करण्यासह किफायतशीर किमतीमध्ये सांडपाणी प्रक्रिया केंद्र (STP) स्थापन करण्यात येणार आहेत. प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याच्या पुनर्वापरासाठी पाण्याचा दर्जा निश्चित करुन ते पाणी नदी प्रदूषण कमी करण्यासाठी नदीमध्ये सोडणे तसेच उद्योग, बांधकाम, शेती, महानगरपालिका यांच्यासाठी वापरले जाणार आहे.

**१३. मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रम**

